


दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com


अनंत चतुर्दशी
च्या सर्व भाविक-भक्तांना
हार्दिक शुभेच्छा !
-संपादक


बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१३२ | शनिवार, दि.०६ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# मराठवाड्यातील १३ लाख हेक्टर खरीप पिके चिखलात !

## ३ हजार ९२९ गावांतील पिकांचे नुकसान; १६ लाख शेतकऱ्यांना फटका

**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठवाड्यात मागील ३ महिन्यांत झालेल्या अतिपावसामुळे विभागातील ३ हजार ९२९ गावांतील खरीप पिकांचा चिखल झाला असून, सुमारे १३ लाख हेक्टरवरील खरीप पिकांचा जणुकाही चिखल झाला आहे. मागील काळात आणि सध्या सुरु असलेल्या पावसात शेतातील उभी पिके पाण्याखाली गेली आहेत. काही ठिकाणी स्थानिक पातळीवर पंचनामे झाले असले तरी सोयाबीन कापूस पूर्ण हातातून गेल्याने मराठवाड्यातील शेतकरी संकटात सापडला आहे.**



१५ लाख ७८ हजार ३३ शेतकऱ्यांनी केलेल्या पेरण्या हातून गेल्या आहेत. असे असताना नुकसानीच्या पंचनाम्यांना अद्याप गती मिळालेली नाही. ५ लाख ६२ हजार ७२७ हेक्टरवरील पंचनामे सध्या पूर्ण झाले आहेत. ७ लाख हेक्टरवरील पिकांचे पंचनामे अजून बाकी आहेत. मराठवाड्यातील १२ लाख ४६ हजार २४९ हेक्टरवरील खरीप हंगामातील पिके अतिवृष्टीमुळे संपुष्टात आल्याचे विभागीय प्रशासनाच्या प्राथमिक अहवालात नमूद आहे. नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान पान २ वर

**पिकांचे नुकसान**

जिरायत-१२ लाख ३६ हजार ३०१ हेक्टर.
बागायत - ३ हजार ८९ हेक्टर.
फळपीक - हजार ८७८ हेक्टर.
एकूण - १२ लाख ४६ हजार २४९ हेक्टर.

**किती गावांतील किती शेतकऱ्यांचे नुकसान?**

| जिल्हा | गावे | शेतकरी | पंचनामे |
|---|---|---|---|
| संभाजीनगर | ५५ | ४०६६ | ६१ टक्के |
| जालना | १८४ | २७६५९ | ०० टक्के |
| परभणी | ३१९ | १४३१३५ | ८२ टक्के |
| हिंगोली | ७०३ | १७२५७७ | ७८ टक्के |
| नांदेड | १३२६ | ६५५४१५ | ७० टक्के |
| बीड | २०६ | ४२८९५ | ७० टक्के |
| लातूर | ७८२ | ३६४५५१ | ०.५९ टक्के |
| धाराशिव | ३६४ | १६७७३५ | ४३ टक्के |
| एकूण | ३९२९ | १५७८०३३ | ४५ टक्के |

# मंडल आयोग शरद पवार यांनी लागू केला असे कोणी म्हटले तर त्याचं कानफाड फोडा!

## शरद पवारांच्या बालेकिल्ल्यात लक्ष्मण हाकेंचा तुफान हल्ला, अजित पवारांसह सुनेत्रा पवारांवर टीकेची तोफ






**बारामती । प्रतिनिधी**

लक्ष्मण हाके यांनी बारामतीत शुक्रवारी शरद पवार यांच्यासह अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. शरद पवार मते आमची घेतात आणि जरांगेंना पाठिंबा देतात असेही हाके म्हणाले. मंडल आयोग शरद पवार यांनी लागू केला असे जर कोणी म्हटले तर त्याचं कानफाड फोडा अशी टीका देखील हाके यांनी केली.

**प्रकाश आंबेडकरांचे फोन वरून भाषण**

हाके यांचे भाषण सुरू असताना वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांचा फोन आला. आंबेडकरांनी उपस्थित जनसमुदायाशी फोनवरून संवाद साधला आणि म्हणाले, "जबरदस्तीने दिलेले आरक्षण आम्हाला मान्य नाही. ओबीसींना रस्त्यावर उतरावे लागेल." या भाषणाने सभेला आणखी धार आली.

**ओबीसी विरुद्ध डुप्लिकेट ओबीसी-हाके**

हाके यांनी मराठा-ओबीसी वादावर भाष्य करताना म्हटले, आतापर्यंत ओबीसी विरुद्ध ओबीसी लढत होती. आता जर ओबीसीचे आरक्षण पडले, तर पुढच्या निवडणुकीत ओबीसी विरुद्ध डुप्लिकेट ओबीसी अशी लढत होईल. यामुळे मराठा आणि ओबीसी समाजातील तणाव आणखी वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

देशभरात मंडल आयोग लागू झाला होता, फक्त महाराष्ट्रातच लागू झाला नव्हता. मंडल आयोगाची चळवळ शेकापचे दिबा पाटील, बबनरावजी ढाकणे, शिवाजीभाऊ शेंडगे, गोपीनाथ मुंडे, छगन भुजबळ, अरुण कांबळे, बाळासाहेब आंबेडकर या सगळ्या माणसांनी लागू केल्याचे हाके म्हणाले.

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी बारामतीत आयोजित ओबीसी मोर्चात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि पान २ वर

# मेंढपाळ तरुणाची हत्या

**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील रायमोहा पोलिस चौकी हद्दीतील दगडवाडी येथे शुक्रवार, ५ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास एका मेंढपाळ तरुणाचा खून झाला. दीपक केरा भिल्ल (वय १९, रा. बऱ्हाणपूर, मध्य प्रदेश) असे या मृत तरुणाचे नाव आहे. दीपक आपल्या कुटुंबीयांसोबत मेंढ्या चारण्यासाठी या परिसरात आला होता.

या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विलास एकनाथ भोसले (वय ५२, रा. वैजापूर, जि. संभाजीनगर) याने दीपकच्या डोक्यात दगड घालून त्याचा खून केला आणि त्यानंतर तो फरार झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, जिल्ह्यात सुरू असलेल्या खुनाच्या घटनांच्या मालिकेत आणखी एका घटनेची भर पडली आहे. घटनेनंतर पाटोदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. पोलिस निरीक्षक संभाजी तागड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.

# भुजबळ कोर्टात गेले तर मंडल आयोगाला चॅलेंज-जरांगे

**छ संभाजीनगर । प्रतिनिधी**

ओबीसी नेते छगन भुजबळ कोर्टात गेले तरी काही होणार नाही. हैदराबाद गॅझेट हे सरकारी दस्तावेज आहे. मात्र मराठा आरक्षणाला काही झालं तर मी मंडल आयोगावर चॅलेंज करणार आहे. देशात अहवालावर जिवंत असणारे एकमेव आरक्षण मंडल आरक्षण आहे. अहवालावर आरक्षण कधीचं लागून असतं, त्यामुळे मराठा आरक्षणाला काही झालं तर मी मंडल आयोगाला चॅलेंज करणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.



छत्रपती संभाजीनगर शहरातील गॅलेक्सी रुग्णालयात मनोज जरांगे यांच्यावर उपचार सुरू आहेत. रुग्णालयातून त्यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली आहे. यावेळी जरांगे पाटील म्हणाले, आम्ही ओबीसीत घुसखोरी करत नाही. तर अधिकृत आरक्षणात येत आहोत. छगन भुजबळांना चांगलं माहीत होतं मराठे आरक्षण घेणार. पान २ वर



छ.सभाजीनगर : १४ सप्टेंबर २५ रोजी होणाऱ्या राज्यव्यापी डिजिटल मीडिया राज्य अधिवेशनाच्या पूर्व तयारी साठी आज परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम देशमुख, विश्वस्त शरद पाबळे,सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, डिजिटल मिडियाचे प्रदेशअध्यक्ष अनिल वाघमारे, परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे, जिल्हाअध्यक्ष बालाजी सूर्यवंशी व इतर सहकारी मित्रांनी नियोजीत संत एकनाथ रंग मंदिर, क्रांती चौक येथे भेट देऊन पाहणी केली.

# एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत, राज्य सरकारने सीसीएमपी कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांची नोंद महाराष्ट्र वैद्यक परिषदेच्या (एमएमसी) स्वतंत्र नोंदवहीत करण्याचे आदेश आज जारी केले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांना मर्यादित स्वरूपात आधुनिक औषधोपचार करण्याचा अधिकार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्य शासनाने २०१४ साली होमिओपॅथी डॉक्टरांसाठी आधुनिक पान २ वर

# महाराष्ट्रातील सहा शिक्षकांचा राष्ट्रीय पुरस्काराने राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

देशभरातील ८१ शिक्षकांसह महाराष्ट्रातील सहा जणांचा राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारा'ने शुक्रवारी सन्मान करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त दिल्लीमध्ये आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण क्षेत्रातील शिक्षक आणि १६ कौशल विकास क्षेत्रातील शिक्षकांचा सन्मान केला. प्रमाणपत्र, रौप्य पदक आणि ५० हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या महाराष्ट्रातील शिक्षकांमध्ये शालेय पान २ वर

# हैदराबाद गॅझेटियरमध्ये नोंद म्हणून प्रमाणपत्र देणार नाही-चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर । प्रतिनिधी**

**हैद्राबाद गॅझेटमध्ये केवळ नोंद मिळाली म्हणून त्याआधारे सर्टिफिकेट देणार नाही. अधिकारी हे नियमाप्रमाणेच सही करतील. कुठलेही कास्ट सर्टिफिकेट चॅलेंज होऊ शकते असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे.**



मराठा आरक्षण जीआर संदर्भात महसूलमंत्री आणि ओबीसी संदर्भात स्थापन मंत्रिमंडळ उपसमितीचे पान २ वर

# गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या !


राज्य लोकतंत्र

**भाग नववा । सुभाष चौरे**

बीड । पुणे : गेली नऊ दहा दिवस गणपती बाप्पा आपली पूजा आर्चा, आराधना मोठ्या भक्ती भावाने केली. या दिवसांमध्ये आपल्या मूषकराजने आपल्यापर्यंत आपल्या गणेश भक्ताच्या अनेक अडचणी मांडल्या. त्यात आपण मार्गही काढला, पण आता हा उत्सव जल्लोष थेट पुढच्या वर्षीच करावा लागेल. प्रत्येक गणेश भक्ताने मनोभावे आपली पूजा केली आहे. त्यांना आपण आशीर्वाद दिलेच असतील, पण या राज्यातील जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आम्ही हा प्रपंच मांडत राहू. भेटू पुढच्या वर्षी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या !

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा आत्मा आहे. दहा दिवस भक्तिभावाने घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांत विराजमान झालेल्या गणरायाचा निरोप म्हणजेच गणेश विसर्जन. 'गणपती बाप्पा मोरया, पुन्हा वर्षी लवकर या' या गजरात नाचत-गात, ढोल-ताशांच्या तालावर, फुलांच्या वर्षावात गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. परंतु या जल्लोषामागे काही गंभीर प्रश्न दडलेले आहेत, जे आपण विसरतो. गणेश विसर्जन म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही. मातीपासून तयार झालेली मूर्ती जलात विसर्जित करणे म्हणजेच गणेश पुन्हा पंचतत्त्वात विलीन होणे, जीवन आणि मृत्यूच्या शाश्वत सत्याचा स्वीकार करणे होय. त्यामुळे हा विधी आत्मचिंतन व अध्यात्माचा संदेश देणारा आहे.

गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात असतो. गणेश चतुर्थीपासून गणपती बाप्पा संपूर्ण देशभर आपल्या भक्तांच्या घराघरात विराजमान होतात. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर दहाव्या दिवशी संपतो, जेव्हा मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत संगीत आणि सामूहिक मंत्रोच्चारात नेली जाते, त्यानंतर नदी किंवा समुद्रासारख्या जवळच्या पाण्यात विसर्जित केली जाते, ज्याला विसर्जन म्हणतात. घरांमध्ये आणि सार्वजनिक पंडाल (मंडप) मध्ये गणेशमूर्ती स्थापित करणे आणि त्यानंतरचे विसर्जन हे विश्वातील निर्मिती आणि विघटन पान २ वर



## थोडक्यात...

### दहा वर्षांच्या मुलाचा हृदयविकाराने मृत्यू

कोल्हापूर: जिल्ह्यातील कोडोली येथे एका दहा वर्षांच्या मुलाचा हृदयविकाराच्या झटक्यामुळे मृत्यू झाल्याची घटना समोर आली. तो दहा वर्षीय मुलगा अन्य मुलांसोबत गणेश मंडळाच्या मंडपात बसला होता. दंगा मस्ती केल्यानंतर तो घरी गेला. आईच्या मांडीवर जाऊन त्याने डोक टेकवले आणि आईच्या मांडीवरच त्याने जीव सोडला. या मुलाचे नाव श्रावण गावडे असे आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मित्रांसोबत गणेश मंडळाच्या मंडपात श्रावण गावडे हा खेळत होता. अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने तो मध्येच खेळ सोडून आपल्या आईच्या कुशीत जाऊन झोपला. मात्र, आईच्या मांडीवर डोके टेकवले आणि श्रावणला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्याच्या आईला काही कळण्याआधीच त्याचा मृत्यू झाला.

### अमिताभकडून लालबागच्या राजाला ११ लाख दान

मुंबई : बिग बी अमिताभ बच्चन यांनी लालबागचा राजासाठी ११ लाख रुपये दान केल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतील प्रसिद्ध गणपती मंडळ लालबागचा राजाचे दर्शन घेण्यासाठी खूप लांबून लोक येतात. रिपोर्टनुसार, यावेळी अभिनेते अमिताभ बच्चन यांनी या मंडळासाठी ११ लाख रुपये दिले आहेत. त्यांनी आपल्या टीमकडून हे पैसे पाठवले आहेत. लालबागचा राजाचे ट्रस्टींनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. यावरून एकीकडे त्यांचे काही फॅन्स कौतुक करत आहेत. तर दुसरीकडे सोशल मीडियावर मात्र त्याबाबत नव्या प्रतिक्रियांना सामोरं जावं लागत आहे.

### महाराष्ट्रात वाघांनी घेतले २१८ जणांचे बळी

अमरावती: जागतिक स्तरावर वाघांच्या संख्येत भारत अव्वलस्थानी असला, तरी वाघ आणि मानव यांच्यातील संघर्ष दिवसागणिक वाढत आहे. सन २०२० ते २०२४ या कालावधीत देशभरात वाघांच्या हल्ल्यात तब्बल ३७८ जणांचा मृत्यू झाला असून त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात २१८ मृत्यू झाले आहेत. विशेषत: चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात मृत्यूची आकडेवारी सर्वाधिक आहे. तर मेळघाटात गेल्या तीन वर्षात सहा जणांचे बळी गेले आहेत. राज्यात ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिरा, पेंच, मेळघाट, बोर व सह्याद्री असे सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. तर, ४८ अभयारण्ये असून ४ संवर्धन राखीव क्षेत्रे आहेत. व्याघ्र प्रकल्पात जागा अपुरी पडत असल्याने वाघांनी नवा कॉरिडॉर शोधला असून नजीकच्या राखीव जंगलाच्या दिशेने त्यांनी मुक्काम हलविल्याने मानव-वन्यजीव संघर्ष होत असल्याची माहिती वन्यजीव अभ्यासकांनी दिली.

### मराठा म्हणूनच आरक्षण मिळावे-मुधोजीराजे भोसले

मुंबई: मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर ५ दिवस आमरण उपोषण केले. त्यांच्या या लढ्याला यश आले आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची प्रमुख मागणीसह हैदराबाद आणि सातारा गॅझेटचीही मागणी त्यांनी केली होती. शासनाने हैदराबाद गॅझेट अंमलबजावणी करण्याचे मान्य केले आहे. आता यावर नागपूरचे राजे मुधोजी भोसले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न देता मराठा म्हणून सरसकट स्वतंत्र आरक्षण द्या, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

### १७ ते १९ सप्टेंबरला शेतकऱ्यांचे आंदोलन

मुंबई : प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात जाऊन शेतकरी आणि शेतमजूर यांची हक्क यात्रा काढून १७,१८, आणि १९ सप्टेंबर रोजी मुंबईत भव्य आंदोलन करण्याच्या इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे. हमीभाव हा चुकीच्या पद्धतीने दिला जातो, कर्जमाफीच्या संदर्भात, पेरणी ते कापणी पर्यंत सर्व खर्च एमआरएचएस मध्ये देण्यात यावे. या सर्व मागण्या घेऊन शेतकरी हक्क परिषद घेण्यात येत असून येणाऱ्या २८ सप्टेंबर रोजी शेतकऱ्यांचा मोठे आंदोलन उभे करण्याचा इशारासुद्धा बच्चू कडू यांनी दिला आहे.

## सुटीची सूचना

**आज शनिवार दि.६ सप्टेंबर २०२५ रोजी अनंत चतुर्दशीनिमित्त दै.राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या रविवार दि.७ सप्टेंबर २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार आणि एजंट बंधूंनी नोंद घ्यावी.**

**-व्यवस्थापक**

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०४ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७७.५० क्विंटल | २,५०१ | २,७२० | २,६०६ |
| ज्वारी/हायब्रिड :५१.५० क्विंटल | २,००० | ३,०६१ | २,४२४ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : २०.०० क्विंटल | ५,४०० | ६,१०१ | ५,८५० |
| उडीद : १५.०० क्विंटल | ४,६०० | ५,३०० | ४,८८८ |
| बाजरी: ५६.०० क्विंटल | १,७०० | २,८९८ | २,५५० |
| मुग: २६.५० क्विंटल | ८,४०० | ८,४०० | ६,२६३ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ४,६५१ | ५,७७० | ५,३७० |

cmyk



अग्रलेख

# बाप्पांना निरोप हा आदर्शवत आणि मंगलमय असावा

गणेशोत्सवात लोकांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. विविध गणेश मंडळांनी सामाजिक मुद्यांवर देखावे सादर केले होते ते बघण्यासाठी लोकांनी रात्रीचा दिवस केला. गणेशभक्तांना आता विसर्जन मिरवणुकीचे वेध लागले आहेत. याही वर्षी राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये विसर्जन मिरवणुकीत डॉल्बी आणि लेझर वापराला स्थानिक प्रशासनाने बंदी घातल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झालेले आहे. बंदीला कायद्याचा आधार असला तरी त्याला व्यवसायाची किनार असल्याने बंदीविषयी नाराजी व्यक्त होताना आढळते. शिवाय गणेश भक्त भलतेच जोमात असतात त्यामुळे नियम आणि आवाहन केले तरी त्याला कोणी जुमानताना दिसत नाही.

हा मुद्दा अनेकदा न्यायालयात देखील पोहोचला आहे. सामाजिक मुद्यांच्या बाबतीत नेहमी असेच घडते. वादविवाद आणि प्रतिक्रियांच्या गदारोळात मूळ मुद्याला बगल दिली जाते. वास्तविक, कोणतीही गोष्ट 'अती केली की तिची माती होते' हे माणसांना नव्याने सांगायला नको. त्या आशयाची म्हण लहानपणापासून माणसे शिकतात पण ती वापरात आणण्यास मात्र कसे विसरतात? डॉल्बी आणि लेझरचा वापर अती प्रमाणात वाढला आहे. छोट्यामोठ्या मिरवणुका, सार्वजनिक कार्यक्रम, विवाह सोहळे यातही त्यांचा वापर होताना आढळतो. हा सारा गोंगाट ऐकणाऱ्यांना मात्र नकोसा होतो.

ध्वनी प्रदूषण ही जागतिक पातळीवरील गंभीर समस्या आहे. तिचे सृष्टी आणि मानवी आयुष्यावरील गंभीर परिणाम संशोधक समाजासमोर मांडतात. सामान्य माणसांना कदाचित तिचे गांभीर्य तितक्याच तीव्रतेने लक्षात येऊ शकेल असे नाही. पण ज्याच्या त्याच्या कानांची काळजी ज्याची त्यानेच घ्यायला हवी. कारण विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी ऐकण्याची क्षमता असलेला दुसरा कान तयार करण्यात संशोधकांना अद्यापपर्यंत यश आल्याचे ऐकिवात नाही. ऐकण्याची क्षमता मोजण्याचे डेसिबल हे प्रमाण आहे. विशिष्ट डेसिबलनंतरचा आवाज सातत्याने कानावर पडला तर माणसांच्या ऐकण्याच्या क्षमतेवर विपरीत परिणाम होतो. अनेकांच्या बाबतीत ती क्षमता कायमची गमावण्याचा धोका नाकारला जाऊ शकत नाही. डॉल्बीचा आवाज त्या क्षमतेपलीकडचाच असतो.

स्वतःचे कान पणाला लावण्यात कोणते शहाणपण दिसते? जे आरोग्याच्या हिताचे नाही त्याचा वापर माणसेच थांबवू शकतात. जसे सोलापूरकर थांबवू शकले. लोक स्वयंस्फूर्त एकत्र आले. त्यांनी सजग सोलापूरकर समिती स्थापन केली. ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनाही त्यात सहभागी झाल्या. त्यांच्या भावना प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी विविध मार्ग अवलंबले. जसे की, मानवी साखळी, मिस कॉल इत्यादी. त्याला यश आले आणि सोलापूरमधील गणेश आगमनाच्या मिरवणुका पारंपरिक खेळ, वाद्ये आणि अभंगांनी गाजल्या. त्याचीच री विसर्जन मिरवणुकीत ओढली जाईल यात शंका नाही. 'अती तेथे माती'ची अनेक उदाहरणे अवतीभवती आढळतात. एकवेळ वापरून फेकून दिल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर बेजबाबदार पद्धतीने इतका वाढला की त्याच्या वापरावर देखील बंदीचे पाऊल सरकारला उचलावे लागले. नद्यांमध्ये सातत्याने कचरा टाकला जातो. त्यामुळे अनेक नद्या प्रदूषित झाल्या आहेत. मृत होण्याचा धोका शास्त्रज्ञ व्यक्त करतात. माणसे नियमांना हरताळ फासतात. कायदे धाब्यावर बसवतात. बंदी कोणालाच आवडत नाही. मग ती घालण्याची वेळ येऊ न देणे समाजाच्याच हातात आहे. युवांकडून जाणत्यांना अपेक्षा असतात. कारण अनेक युवा विचार करू शकतात. समस्यांची त्यांना जाणीव त्यांना तीव्रतेने असू शकते. तंत्रज्ञानाच्या मदतीने त्या समस्यांवर मात करण्याचा अनेकांचा प्रयत्न आढळतो. सामान्य माणसांचे जगणे सहज आणि सुसह्य व्हावे असे अनेक ॲप तयार केले जातात. केवळ डॉल्बी आणि लेझर किरणांचा वापरच नव्हे तर विविध प्रकारच्या सामाजिक समस्यांची तड लावण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन असलेल्या सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले जाऊ शकतात. त्याची वाट सोलापूरकरांनी दाखवली आहे. आता तिला मोठे स्वरूप येण्याची गरज आहे. आज होत असलेल्या विसर्जन मिरवणुका म्हणजेच बाप्पाला निरोप देताना हा निरोप तेवढाच आदर्शवत आणि मंगलमय असावा, एवढीच अपेक्षा.




आष्टीः गोवंश हत्या बंदी कायद्यानंतर काही गोरक्षकांनी कुरेशी समाजाची अडवणुक करून हल्ल्याचे प्रयत्न झाले त्यामुळे कुरेशी समाजानी भाकड जनावरे खरेदीचा व्यवसाय बंद केला मात्र याचाच फायदा यांच्याच समाजातील काहींनी घेवून जनावरे खरेदी करत एका ठीकाणी डांबूण ठेवले. याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांना सोबत घेत छापा मारल असता या ठिकाणी गोवंश जातीचे जनावरे आणि काही वासरे आढळून आले रात्री उशीरापर्यंत कारवाई सुरू होते.(छायाःशरद रेडेकर )

# दारूची वाहतूक करणारे वाहन पकडले



**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा वाहतुक शाखेच्या वतीने कन्हैयानगर चौफुली, जालना येथे वाहनावरील प्रलंबित दंड वसुलीसाठी विशेष मोहीमेचे आयोजन सुरू केलेले होते. सदर मोहीम राबवित असताना कन्हैयानगर चौफुली येथे ईटिंगा वाहन क्रमांक ०३ ६९४७ या वाहनास थांबवून विचारपूस करुन वाहनाची तपासणी केली असता सदर वाहनामध्ये विदेशी दारुचे ०९ बॉक्स ज्यामध्ये एकूण ४८४ विदेशी दारुच्या बाटल्या किंमत अंदाजे १,१५.३२०/-रुपयेच्या मिळून आल्या. या कारवाई संदर्भात जिल्हा वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत चतुरे यांना विचारले असता ते म्हणाले की सदरील गाडीला दारू वाहतूक करण्याची परवानगी नसून त्या गाडीमध्ये दारू वाहतूक करता येत नाही तसेच सदरील दारू छत्रपती संभाजी नगर इथे घेतलेली आहे ही दारू बेकायदेशीर विक्रीसाठी बिअर शॉपी बार करता घेऊन जात असताना पकडली. सदर वाहन चालकाचे नांव, गांव विचारले असता त्याने त्याचे नांव अंकित प्रभाकर वाघ, वय २५ वर्षे रा. वरुड ता. जाफ्राबाद असे सांगितले सदर वाहन चालकाकडे दारु वाहतुकीचा कोणताही परवाना नसतांना सदर वाहनधारकाने विदेशी दारुचे बॉक्स वाहनामध्ये भरुन घेऊन जात असतांना मिळून आल्याने नमूद वाहनधारकांविरुध्द महाराष्ट्र प्रोव्हिबीशन कायदा तसेच मोटार वाहन कायदा कलम अन्वये पोलीस ठाणे चंदनझिरा येथे गुन्हा दाखल करण्याचे कामकाज सुरु आहे. सदर कारवाईमध्ये विदेशी दारुचे ०९ बॉक्स व एक इटिंगा कार असा एकूण ४,६५,३२०/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस ठाणे चंदनझिरा हे करीत आहे. सदरची कामगिरी मा.श्री अजयकुमार बंसल, पोलीस अधीक्षक , मा. श्री आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली बाळासाहेब पवार, जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सपोनि श्री चंद्रकांत चातुरे, सोबत पोलीस अंमलदार पोहेकों गणेश जाधव, पोहेकों विजय लोखंडे, पोशि/राजेश दहिवाळ, पोशि महंमद चौधरी चापोहेकों गोरखनाथ राठोड, पोशि नवनाथ पाटील इत्यादींनी सदरची कामगिरी केलेली आहे.

## कोणाचा धंदा कोणी केला हायजॅक

आष्टी । प्रतिनिधी

शहरातील शेकापूर रस्त्याला काही जरशी जातीच्या. गाईचे वासरे कत्तलखान्याच्या उद्देशाने आणल्याची माहिती आष्टी पोलीस स्टेशनला गुप्त वार्ताहर मार्फत मिळले असता आष्टी पोलीस स्टेशनचे पोलीस तालुका निरीक्षक शरद भुतेकर यांना मिळताच यांनी आष्टी पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर नितीन काकडे, नंदकिशोर तांदळे, रामहरी भांडणे पोलीस शिपाई श्री गणेश राऊत, अशोक तांबे, संतोष आव्हाड, असे मिळून आज रोजी शेकापूर रोड वरील अवैधरित्या गोवंशय जरश्या गाईचे ३५ वासरे कत्तल करण्याच्या उद्देशाने चारा पाणी याची व्यवस्था न करता क्रूरपणे बांधून ठेवले होते, सदर गोवंशय जर्सी गाईच्या जनावरांचे ३५ वासरांचे आज रोजी प्राण वाचवले. महाराष्ट्र शासनाने गोवंश हत्या कायदा केल्याने आष्टी शहरातील कुरेशी समाज आता या धंद्यापासून बाजूला गेला आहे तो दूध धंदा शेळीपालन व इतर व्यवसायामध्ये गुंतला आहे मात्र यांचाच धंदा पडद्याआड कोण करत आहे याचा तपास घेणे पोलिसांना गरजेचे आहे आज ३५ जरशी वासरांची कत्तल खाण्यापासून वाचवण्याचे काम आष्टी पोलीस स्टेशन ने केले आहे.

## नालीत मृतदेह आढळला

बीड। प्रतिनिधी

शहरातील माळीवेस भागातील एका नालीमध्ये मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती शहर पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला. सदरील मयताची दुपारी ओळख पटली आहे. शहरामधील माळीवेस परिसरातील नालीत सकाळी मृतदेह आढळून आला. याची माहिती शहर पोलिसांना झाल्यानंतर पो.नि. शितलकुमार बल्लाळ सह आदीनी घटनास्थळी जावून पंचनामा केला. सदरील मयताची दुपारी ओळख पटली असुन त्याचे नाव उमेश गोविंदराव घटे (वय ५२, रा.अयोध्या नगर पेठ बीड) असे आहे.

## पान ६ वरून...

### पोलीस प्रशासनाचे वराती

आपल्या समाजात सार्वजनिक सण उत्सव साजरे करण्यासाठी नागरिक व व्यापाऱ्यांकडून देणगी अथवा वर्गणी घेण्याची प्रथा आहे. परंतु देणगी अथवा वर्गणी किती द्यावी हा प्रत्येक नागरिक व व्यापाऱ्याचा स्वतंत्र व वैयक्तिक निर्णय आहे.तथापि, वर्गणी व देणगी स्वखुषीने दिली जाती आणि ती आनंदाने स्वीकारायला हवी. परंतू काही ठिकाणी गणेशोत्सव मंडळे व उत्सव समित्यांकडून नागरिक व व्यापाऱ्यांकडून बळजबरीने वर्गणी गोळा केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकारची सक्ती करणे हा गुन्हा असून कायद्यानुसार दंडनीय आहे. म्हणूनच कोणीही नागरिक किंवा व्यापाऱ्याकडून बळजबरीने वर्गणी घेऊ नये. असे कृत्य केल्यास संबंधित व्यक्ती, मंडळ किंवा समितीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी अशा प्रकारची सक्ती झाल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधून कळवावे. सण-उत्सव शांततेत, सौहार्दपूर्ण वातावरणात व सर्वांच्या सहभागाने साजरे करण्यासाठी नागरिकांना सहकार्य करावे, कुणाकडूनही बळजबरीने वर्गणी गोळा करु नये, तशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास पोलीसांकडून कठोर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन बीड पोलीसांकडून करण्यात येत आहे.

-----------

### डिजे मुक्त शांततेत,सुनियोजनाने

सार्वजनिक ठिकाणी या उत्सवात मांडून दहा दिवसांत आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, महिला सक्षमीकरणासाठी समस्त गावकरी महिला मंडळींचा कार्यक्रम,बाल कलाकारांच्या विविध प्रकारच्या उपजत ज्ञान प्रसारित व्हाव्यात यासाठी राबवलेल्या उपक्रमांसाठी चोपनवाडी जय हनुमान गणेश मंडळांच्या पदाधिकारी यांचे कौतुक याप्रसंगी ढाकणे यांनी केले.शांतता समितीच्या बैठकी साठी विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.गोपनीय शाखेचे कर्मचारी युवराज श्रीडोळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

-----------

### गोसावी सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी

निवड करण्यात आली. या नियुक्तीनंतर सिद्धेश्वर गिरी यांनी विश्वास व्यक्त करताना सांगितले की, ''गोसावी समाजातील तरुणांना शिक्षण, रोजगार व स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. समाजातील ऐक्य आणि संघटनशक्ती वाढविणे हीच माझी प्राथमिकता असेल.' सिद्धेश्वर गिरी यांच्या निवडीबद्दल समाजातील विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सुलतानपूरसह संपूर्ण बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. स्थानिक नागरिक व सामाजिक बांधवांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच बीड जिल्ह्यामध्ये जुन्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संपूर्ण जिल्ह्याचे नवीन कार्यकारिणीची निवड लवकरच तालुका निहाय दौरा करून बैठका घेऊन सर्वानुमते करण्यात येईल असे त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

-----------

### आनंदनगरी नव्हेच

लोकाचा सहारा घेऊन सामान्य जनतेची लूट करत आहेत. शिवाय यांच्याच व्यवसायाशी निगडित काही लोक गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल चोरी व पाकीट मारी, मंगळसूत्र चोरी करत असल्याची चर्चा मागील दोन वर्षांपासून जोर धरत आहे.यावर्षी ही आता पर्यंत ५-१० मोबाईल चोरीला गेले असून यातील फक्त एक दोन प्रकरनाची माजलगाव पोलीस ठाण्यात नोंद आहे.मंगळवारी रात्री ओम भंडारी व नंदिनी जेथलिया या दोघांचे मोबाईल गर्दीचा फायदा घेऊन चोरांनी लंपास केल्याची घटना पोलीस दपतरी नोंद आहे.चार दिवस उलटूनही या प्रशासन ॲकशन मोड वर नाही.

**प्रशासनाचे हात ओले..?**

न प,महसूल, बांधकाम,पोलीस प्रशासन या सर्वांची परवानगी आनंद नगरीं सुरु करण्यासाठी लागते कसलीही खतरजमा न करता केवळ कागदावर वजन ठेवले कि या परवानग्या या नंबर दोनच्या धंदेवाल्याना दिले जात आहे.

**फक्त पोलीस उपस्थित...**

पोलीस प्रशासन सोडता इतर कोणत्याही प्रशासनाचे कर्मचारी या ठिकाणी रात्रीच्या वेळी नसतात. केवळ पोलीस प्रशासनचा १ कर्मचारी व चार पाच होमगार्ड या ठिकाणी असतात.ते पण आपल्या परिवाराला आनंदनगरीचा ''मेवा'' चाखवण्यातच व्यस्त असतात यातूनच चोराचे फावत आहे.

-----------

### डॉ.विलास खरात यांच्या

सोपवण्यात आला आहे.. कलम १९२ : दंगल घडवण्यासाठी उत्तेजितपणे चिथावणी देणे. कलम ३५३(१) : सार्वजनिक गैरव्यवहारास कारणीभूत ठरणारी विधाने / इलेक्ट्रॉनिक माध्यमातील अफवा किंवा हिंसक पोस्ट.या कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे एफआयआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सोशल मीडियावरील पोस्टमुळे समाजात असंतोष पसरून शांतता भंग होण्याची शक्यता होती. याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्याने सखोल तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे स्थानिक पातळीवर मोठी चर्चा रंगली असून, कायदेशीर कारवाईनंतर पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

-----------

### गणेशोत्सव,ईदच्या

सार्वजनिक शांततेस धोका निर्माण होऊ नये म्हणून आरोपींविरुद्ध कलम १६३ बी.एन. एस. एस. प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्याने त्यांना दिनांक ०४/०९/२०२५ रोजी १८.०० वा. ते दिनांक ०७/०९/२०२५ रोजी १७.०० वाजे पावतो त्यांना बीड तालुक्यात तात्काळ प्रवेश बंदी करण्याचे आदेश विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक बीड यांनी केले आहेत.

-----------

### गायक राज रायते

छत्रपती संभाजी नगर येथे भव्य सत्कार समारंभ तसेच गायनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. या ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांचाही गुणगौरव सत्कार समारंभ सोहळा असणार आहे. सदरील कार्यक्रमाचे आयोजक आणि संयोजक गणेश पवार , संताजी सेना पदाधिकारी हे आहेत. यावेळी संपूर्ण तेली समाज बांधव आणि गायक राज रायते यांचे चाहते उपस्थित राहणार असून, खासदार, आमदार, आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सत्कार समारंभ होणार आहे. गायक राज रायते हे बीडचे असून बीड जिल्ह्याचे नाव ते संपूर्ण महाराष्ट्रात गाजवत आहेत. तसेच संपूर्ण रायते कुटुंबाचे नाव त्यांनी लौकिकास आणले आहे. आत्तापर्यंतच्या संघर्षात राज रायते यांच्या आई -वडिलांचा मोलाचा वाटा आहे. तसेच त्यांचे आजोबा, पंजोबा यांचीही पुण्याई त्यांच्या पाठीशी आहे. माजी मंत्री जयदत्तजी अण्णा क्षीरसागर यांची खंबीर साथ राज यांना आतापर्यंत लाभली आहे. तेली तेली समाजभूषण पुरस्कार जाहीर झाल्यामुळे अनेक ठिकाणावरून राज रायते यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत असून आहे. राज रायते हे केवळ १८ वर्षाचे असून प्रथमच तेली समाजात इतक्या कमी वयात समाजभूषण पुरस्कार त्यांनी मिळवला आहे. संपूर्ण तेली समाजात राज रायते यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.राज रायते यांचे संताजी महाराज जगनाडे यांच्यावरील गाणे खूप प्रसिद्ध झाले आहे आणि या प्रसिद्धीमुळे राज रायते यांचे संपूर्ण महाराष्ट्रभर सत्कार सुद्धा होत आहेत.

-----------

### चिमुरडीवर झालेल्या

त्यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे सदरील घटना घडली आहे. बीड जिल्हामध्ये प्रमुख्याने परळी पोलीस आपल्या कर्तव्यात कसूर करीत आसल्यामुळे परळी शहरामध्ये गुन्हेगार लोकांवर पोलीसांचा म्हणावा चे तेवढा वचक राहीला नाही. परळी पोलीस अन्यत्र गुंतलेले असल्यामुळे रात्री दिलेल्या ड्यूट्या ते सक्षमप

-----------

### माणिक नगर गणेश मंडळाच्या

आयोजन करण्यात येते. यंदा महिलांसाठी होम मिनिस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी होम मिनिस्टर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेस परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यावेळी होम मिनिस्टर स्पर्धेत महिलांसाठी विविध खेळ घेण्यात आले. युवती पासून वयोवृद्ध महिला यामध्ये सहभागी होत खेळांचा आनंद घेतला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य यांनी परिश्रम घेतले.

---------------

## पान १ वरून...

### मराठवाड्यातील १३ लाख

झाले आहे. लातूर दुसऱ्या क्रमांकावर, हिंगोली तिसऱ्या, धाराशिव नुकसानीत चौथ्या क्रमांकावर आहे. अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील २८९५ मालमत्तांचे नुकसान झाले आहे. ६ मालमत्ता पुरात वाहून गेल्या. ४१५ मालमत्तांचे कमी-अधिक प्रमाणात नुकसान झाले. २८९५ मालमत्तांची अशंतः पडझड झाली आहे. ७२ झोपड्या पुरात वाहून गेल्या. २५६ जनावरांचे गोठेही पडले. तर १ हजार ४९ सर्व प्रकारांतील जनावरांचा मृत्यू अतिवृष्टीत झाला. ५० व्यक्ती पुरात वाहून व वीज पडून दगावल्या. विभागातील ८ हजार ५५० गावांपैकी सुमारे ४ हजार गावांतील खरीप पिकांचा चिखल झाला आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामातील खरिपाचे ५० टक्के उत्पादन घटण्याची चिन्हे आहेत. याचा परिणाम आगामी काळातील महागाई वाढण्यावर होण्याची शक्यता आहे.प्रामुख्याने आजही बहुतांशी शेती पिकाचे पंचनामे झालेले नाहीत

-------

### मंडल आयोग शरद पवार यांनी लागू केला

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्या मागण्या सरकारने मान्य केल्याने ओबीसी समाजात असंतोष पसरला आहे. याच पार्श्वभूमीवर हाके यांनी शरद पवार यांच्यावर गंभीर आरोप केले. ''शरद पवारांनी मनोज जरांगेंना उभं केलं आणि महाराष्ट्राच्या मानगुटीवर भूत बसवलं,'' असा घणाघात हाके यांनी केला. हाके यांनी शरद पवार यांना ४०० संस्थांचे अध्यक्ष असल्याचा टोला लगावला. ''कुटुंबाबाहेर कारखाने, आमदारकी, खासदारकी जाऊ न देणारे शरद पवार रयत शिक्षण संस्था आणि वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष कसे झाले? महाराष्ट्रात मुख्यमंत्रीच रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष होतो, पण शरद पवारांनी नियम बदलून स्वतः त्या पदावर कब्जा केला,'' असा गंभीर आरोप हाके यांनी केला. अजित पवारांवरही हाके यांनी जोरदार टीका केली. ''कॅनलच्या कंपाऊंडवर गोधडी वाळत घातली तर बघा, असं अजित पवार म्हणाले. पण हे कंपाऊंड तुझ्या बापाचं आहे का?'' असा थेट सवाल त्यांनी विचारला. ''सत्तेतून पैसा, पैशातून कारखाने आणि पुन्हा सत्ता, असं चक्र अजित पवार चालवतात. सत्ता कोणाचीही असो, यांचा मंत्रिमंडळात समावेश असतोच,'' असं हाके म्हणाले.

------------

### एक लाख होमिओपॅथी

औषधशास्त्रावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम म्हणजेच सीसीएमपी कोर्स सुरू केला होता. यामागचा उद्देश म्हणजे ग्रामीण व दुर्गम भागात प्राथमिक आरोग्य सेवा सक्षम करणे आहे. या कोर्ससंदर्भात सरकारने ३० जून २०२५ रोजी आदेश काढून, कोर्स पूर्ण करणा-या डॉक्टरांची नोंद महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडे करण्याचे निर्देश दिले होते सरकारच्या या निर्णयाला विरोध करत, इंडियन मेडिकल असोसिएशन पुणे शाखेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना कोणताही दिलासा नाकारत, राज्य सरकारच्या निर्णयावर स्थगिती देण्यास नकार दिला.उच्च न्यायालयाचा निर्णय लक्षात घेता, राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाने आज अधिकृत आदेश काढत, सीसीएमपी कोर्स पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांची नोंद एमएमसीच्या स्वतंत्र नोंदवहीत करण्याचे निर्देश दिले आहेत. मध्यंतरी होमिओपॅथी डॉक्टर्स विरुद्ध ॲलोपॅथिक डॉक्टर्स असा संघर्ष ही बघायला मिळाला होता. आता सरकारच्या आदेशाने राज्यातील एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा मिळाला आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करत अनेक होमिओपॅथी डॉक्टर्स संघटनांनी समाधान व्यक्त केले आहे.

---------

### हैदराबाद गॅझेटियरमध्ये नोंद म्हणून

अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेले हे विधान वाद वाढविणारे ठरू शकते. हैद्राबाद गॅझेटच्या अंमलबजावणीवरून ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांची नाराजी नाही. आक्षेप आणि संभ्रम आहे, तो दूर करू. कुठल्या वाक्याबद्दल संभ्रम आहे त्यावर चर्चा करून तोडगा काढू असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, नागपूर जिल्हा परिषद निवडणुकीत लागू करण्यात आलेल्या झिरो रोस्टर संदर्भात अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांनी उच्च न्यायालय, नागपूर येथे याचिका दाखल केली आहे. या रोस्टरमुळे काही जिल्हा परिषद सर्कलमध्ये फिरते आरक्षण लागू झाले नाही आणि त्यामुळे आरक्षणाचा लाभ मिळाला नाही, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. यावर बोलताना बावनकुळे यांनी याचिका दाखल करणे हा याचिकाकर्त्याचा अधिकार आहे. राज्य शासन कुठलाही अधिनियम कधीही वापरू शकते, ५ रोस्टर झाले, ६ व्या रोस्टरसाठी लोक मिळत नाही, विधी विभागाचे मत घेऊन रोस्टरचा निर्णय घेतला, आम्ही आमची बाजु मांडू असेही ते म्हणाले.

-----------

### महाराष्ट्रातील सहा शिक्षकांचा राष्ट्रीय

शिक्षक डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) यांच्यासह उच्च शिक्षण क्षेत्रातील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस. व्ही. पी. एम. इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती), आणि कौशल्य विकास क्षेत्रातील अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे.

----------

### गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या !

चक्राचे प्रतीक आहे. विसर्जन मिरवणुका समाजातील ऐक्याचे द्योतक आहेत. वेगवेगळ्या समाजघटकांतील, पिढ्यांतील, वर्गांतील लोक एकत्र येतात. उत्साह, गजर, नृत्य, फुलांचा वर्षाव यातून 'सामूहिक आनंद' प्रकट होतो. परंतु हाच उत्साह कधी कधी बेभान होतो आणि ध्वनीप्रदूषण, वाहतूककोंडी, अपघात अशा समस्याही वाढतात. सर्वात गंभीर बाब म्हणजे विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लॅस्टिकच्या सजावटी या थेट नद्या, तलाव, समुद्राचे पाणी दूषित करतात. जलीय प्राण्यांचा मृत्यू होतो, पिण्याच्या पाण्यावरही परिणाम होतो. विसर्जनानंतर तलावांच्या काठावर विखुरलेले कचरे, फुलांच्या माळा, न वापरलेली सजावट हे शहराचे कुरूप चित्र दाखवतात. उत्सवाचा आनंद घेणे प्रत्येकाचे हक्क आहे. पण या आनंदासोबत निसर्गाची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे. मातीच्या मूर्तींचा वापर, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलावांत विसर्जन, प्लॅस्टिक टाळणे हे उपाय आपण स्वीकारले पाहिजेत. अनेक शहरांमध्ये 'घरगुती विसर्जन तलाव' ही संकल्पना लोकांनी हळूहळू आत्मसात केली आहे, ही सकारात्मक बाब आहे बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राण प्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायाची प्राण प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे १० दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे १० दिवस गणेशोत्सव साजरा होतो. गणपतीची प्राण प्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तीचे विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही. गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तीचे विसर्जन दीड, दोन, पाचव्या किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी करतात. हे दिवस आनंदात-उत्साहात गेल्यानंतर गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते आणि नियमानुसार प्रथेनुसार गणेशाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं. त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं. निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे, ज्या गोष्टीची सुरुवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तीचेच करायचे नसते तर आपल्यातील दुर्गुणांचे सुद्धा करायचे असते. अनंत चतुर्दशीचा दिवस, एकट्या मुंबईत वर्षाला सुमारे दीड लाख मूर्तीचे विसर्जन केले जाते. गणपती विसर्जन पाण्यातच का केले जाते, या विधी मागे सुध्दा काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसर्गाशी निगडीत आहे. निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो, गणपती विसर्जनांच्या बाबतीतही असेच आहे. ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते, त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे उल्लेख आहे. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे. कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवैद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे. अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती अशीही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात. गणेश विसर्जन हा आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा उत्सव आहे. मात्र तो पर्यावरणाच्या हानीचा कारणीभूत ठरू नये. 'बाप्पा पुन्हा वर्षी लवकर या'असे गजर करताना आपण त्याला प्रदूषित नद्या, रासायनिक कचऱ्याचा डोंगर दाखवला तर ती खरी भक्ती ठरेल का? आता वेळ आली आहे की श्रद्धा आणि जबाबदारी यांचा समतोल राखावा. गणेशोत्सव पर्यावरणपूरक झाला तरच आपले ''मोरया'' खऱ्या अर्थाने गजर ठरेल. चला भेटत राहो, आता पुढच्या वर्षी पुन्हा आमच्या अडचणी मांडत राहो. आम्ही रोज आपली साधना करतो पण उत्सव आता थेट पुढच्या वर्षीच. एक वर्षाच्या कार्यकाळात काय काय घडामोडी होतात यावर आम्ही बोलत राहू मात्र आता वेगळ्या माध्यमातून.

--------------

### भुजबळ कोर्टात गेले तर

आम्ही मुंबईत गेलो, विजय घेऊन परत आलो. भुजबळ यांचा विरोध बघता मराठ्यांनी ओळखायचं की ,आपण मराठे जिंकलो आहे. छगन भुजबळ आता शक्यतो ओबीसी नेता असलेली ओळख मिटू देणार नाही. त्याच्यापेक्षाही खूप मातब्बर नेते आहेत. समोरच्या ओबीसी नेत्याची छेड काढतो. उद्या त्या नेत्यांचे कसे नाक कापायचे, असं करून तो बाजूला सरकवतो. भुजबळ मरायला टेकला जरी तरी त्याच्या अंगातील खोड जाणार नाही, अशी बोचरी टीका मनोज जरांगे यांनी केली आहे.

------------

cmyk

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. ०६ सप्टेंबर २०२५



## थोडक्यात...

### हसु आणि आसु हास्य कविता आणि भावनिक कवितांचे मिश्रण असणारा प्रयोग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

हसु आणि आसु या व्दिपात्री भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक अंगांना स्पर्श करणारा प्रयोग हास्यकल्लोळ, अश्रुंना वाट मोकळी करून ठरला, सामाजिक विडंबन करणारी परंतु आशयपूर्ण,पर्यावरण पुरक वडाच्या झाडाची सांस्कृतिक विषयाशी निगडीत कविता सादर केली



माणसाने माणसाशी कसे वागावे याची प्रतिमा माणुस या कवितेतून त्यांनी प्रगट केली. माणसाचे एकटेपण व अनावश्यक संवाद ऱ्हदयाचे ठोके वाढविणारा होता. दोन माकडांचा संवाद माणुसकीची शिकवण देऊन गेला. महालक्ष्म्या आल्या, शुभं करोती या कवितांनी माणसाची बाल्यांवस्था व संस्कार सांगितले. हा त्यांचा १००१ वा प्रयोग अंबाजोगाईतील (तिसरा) प्रयोग झाला. विजय पोहनेरकरांच्या कवितांचे सादरीकरण व प्रा.रविंद्र मगर यांचे समायोचित निवेदन या दुग्धशर्करा योगाचे साक्षी होण्याचे भाग्य रसिकांना लाभले. पाहुण्यांचे स्वागत यो. शि.संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर व कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर यांनी केले.संचालन शारदा मुंडे यांनी तर पाहुण्यांचा परिचय किर्ती बेदरकर यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार अनिता लोंढे यांनी मानले. या कार्यक्रमास संस्था पदाधिकारी,संचालक, प्रतिष्ठित नागरीक,कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कल्लोळ तिर्थात गणपती विसर्जन करू नये -गाडेकर

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र त्वरितादेवी देवस्थान व तुळजाभवानी देवीचे मंदिर असून याच परिसरात तीर्थकुंड म्हणून प्रसिद्ध असलेले पुरातण कल्लोळ तीर्थ आहे. या कल्लोळ तीर्थातील पाणी भाविक-भक्त तिर्थ म्हणून तोंडात घेवून डोळयाला लावतात. धार्मिक ठिकाण असलेल्या या कल्लोळ तीर्थाची विटंबना होऊ नये यासाठी तीर्थ कुंडात गणपती बाप्पाचे विसर्जन करू नये असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकारद्वारे केले आहे. इतर ठिकाणी श्री गणरायाचे विसर्जन करण्यासाठी ग्रामपंचायतचे प्रशासक श्री मुसळे साहेब व पोलिस प्रशासन यांनी गांभीर्याने विचार करून योग्य पध्दतीने व्यवस्था करण्याची दक्षता घ्यावी अशी मागणी देखील बापू गाडेकर यांनी केली आहे.

### गोरक्षनाथ टेकडी येथे रविवारी अनिल म.कासकर यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील पहिली पुण्यतिथी भाद्रपद शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. अनिल महाराज कासकर मौजवाडी ता.जि.बीड यांचे रविवार दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मौजवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## बीड जिल्ह्यात ४८६ मि.मी.पाऊस

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये जून ते सप्टेंबर या काळात ४८६.९ मि.मी.पाऊस झाला. सरासरीपेक्षा ही टक्केवारी ८६ टक्के आहे. मागील वर्षी याच काळात ६६७.९ मि.मी.पाऊस झाला होता. ही सरासरी टक्केवारी ११८मि.मी.एवढी होती. यामध्ये बीड तालुक्यात ५१६.४ मि.मी., पाटोदा-५४७.१ मि.मी., आष्टी-२७२ मि.मी., गेवराई-४८७.८ मि.मी., माजलगाव-५६६.५ मि.मी., अंबाजोगाई-५८३.३ मि.मी., केज-५०४.९ मि.मी., परळी-५६७.३ मि.मी., धारूर-५९१.३ मि.मी., वडवणी-४१८.५ मि.मी.तर शिरूर कासार तालुक्यात ४७७.६ मि.मी.एवढा पाऊस झाला.

# माजलगाव-जीवनापूर गोवर्धन बस पंधरा दिवसांपासून बंद

## शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगावजीवनापूरगोवर्धन या मार्गावरील एसटी बससेवा गेल्या पंधरा दिवसांपासून ठप्प आहे.या निर्णयामुळे आठदहा गावांतील शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असून, नागरिक,महिला व ज्येष्ठ प्रवाशांनाही गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे.बस बंद असल्याने उमरी, सिमरी पारगाव, जीवनापूर,गोवर्धन, लोणगाव,देवळा, एकबुर्जी यांसह वाडीवस्त्यांवरील विद्यार्थ्यांना दररोज प्रवासासाठी त्रास सहन करावा लागत आहे.खाजगी वाहन चालक प्रवाशांची अडवणूक करून अवाजवी भाडे आकारत असल्याने सर्वसामान्यांवर आर्थिक भार वाढला आहे.सरपंच छगन कांबळे व वैजनाथ घायतिडक यांनी बससेवा तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.अन्यथा आगारप्रमुखाच्या दालनात लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला आहे.**

गौरीगणपती सणासुदीच्या काळात बस बंद असल्याने बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या



महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रवास खर्चात वाढ झाल्याने महिला व विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून,बससेवा तातडीने सुरू करण्याची मागणी होत आहे.

“ गाडी चालू करू परंतु या मार्गावर दोन्हीही बाजूंनी बाभळीच्या फांद्या रस्त्यावर येत असल्याने आम्ही काही दिवस गाडी बंद केली होती. आज ही गाडी पाठवली होती; परंतु या भागातील ग्रामस्थांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. झाडांच्या फांद्या व काही ठिकाणी रस्त्याची अडचण असल्याने गाडी बंद ठेवावी लागली होती

-सुहास कोळपकर

आगारप्रमुख माजलगाव

“ माजलगावजीवनापूरगोवर्धन या राज्य रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठाले खड्डे पडले असून दोन्हीही बाजूंनी झाडांच्या फांद्या रस्त्यावर आल्या आहेत.याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे.या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी,अन्यथा आंदोलन करण्यात येईल.

-- दिपक पौळ उमरी,ग्रामस्थ

# साडेतीन लाखांच्या केबलसह चोरास अटक

**बीड । प्रतिनिधी**

**दिनांक ०१सप्टेंबर रोजी पोलीस स्टेशन दिंद्रुड हद्दीत चाडगाव शिवारातून चोरीस गेलेल्या साडेतीन लाखाच्या केबलसह एका चोरास अटक करण्यात आली असून आणखी संशयीतांना अटक करण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.**

चाडगाव शिवारामध्ये असलेल्या तालेतूताई सोलार प्रोजेक्ट क्रमांक ०४ येथून अज्ञात चोरट्यांनी ६००० मीटर कॉपर केबल (१.५ , ६ . साईज) चोरीस नेली होती. सदर केबलची किंमत रुपये ३,४८,०००/- एवढी आहे. या प्रकरणी सुरक्षा अधिकारी श्री. भागवत नामदेव सांगळे यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे गुरनं. २२९/२०२५, कलम ३०३(२), ३२४(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासादरम्यान संशयित आरोपी राजू अर्जुन काळे, वय २५ वर्षे, रा. लक्ष्मीनगर, भूम, जि. धाराशिव यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने सदर चोरी इतर ६ ते ७ साथीदारांसह केल्याची कबुली दिली. आरोपीसह चोरट्यांनी चोरी केलेला मुद्देमाल पोलिस व स्थानिक नागरिकांची चाहूल लागल्याने ठिकाणीच ठेवून पसार झाल्याचे उघड झाले. आरोपीच्या कबुलीवरून दाखविलेल्या ठिकाणी केलेल्या तपासणीत सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल, ६००० मीटर कॉपर केबल किंमत ₹३,४८,०००/- बोलेरो जीप क्र. २२ ५७५७ किंमत अंदाजे ₹३,४०,०००/- असा एकूण किंमत ₹६,८८,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणातील इतर आरोपींची नावे निष्पन्न करून त्यांना अटक करण्यासाठी पुढील तपास पोऊपनि. संजयकुमार राठोड हे करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत,अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे. दिंद्रुड प्रभारी अधिकारी महादेव ढाकणे सहाय्यक पोलीस निरीक्षक, सलमान शेख पोलीस उपनिरीक्षक, संजयकुमार राठोड, पोना/राम ढवळे, पोशि/सचिन गायकवाड, चालक पोशि/ ज्ञानेश्वर मेहत्रे यांनी केली.



आष्टी : शहरात गणेश विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली असून यंदाचा डीजे मुक्त गणपती असून गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये पारंपारिक वाद्याचा गजर तसेच शिवकालीन खेळ दाखवले जात आहे आष्टी शहरातील गोंधळी समाजाचा हिंदवी रेणू राई गणेश मंडळाच्या वतीने विसर्जन मिरवणुकीमध्ये शिवकालीन दानपट्टा, भाला, तलवारबाजीचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. (छाया शरद रेडेकर)

# सय्यद गुरुजींनी अनेक विद्यार्थी घडवले



आष्टी । प्रतिनिधी


सय्यद अमीनोद्दीन गुरुजी त्यांना सर्वजण सय्यद गुरुजी म्हणत.आज पासून साठ,बासस्ट वर्षांपूर्वी मौजे चिंचाळा येथून सुलेमान देवळा या दूरच्या गावी जि.परिषदेचे शिक्षक या नात्याने सय्यद गुरुजी पहाटे निघून प्रार्थनेच्या वेळी शाळेत पोहोचत.अपार कष्ट करण्याची क्षमता अंगी बाळगणारे हे हाडाचे शिक्षक होते.त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले.त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी समाजात नावलौकिक मिळविला. मी तरुण असताना सय्यद गुरुजी सोबत काम करण्याची मला संधी मिळाली.एक परिश्रमी शिक्षक काय असतो हे मी जवळून अनुभवले आहे.असे जुन्या पिढीतील शिक्षक गंगाधरराव भागवत हे सय्यद गुरुजी यांच्या विषयी बोलताना म्हणाले.

आष्टी जि.बीड येथे जि.प.मुलांच्या शाळेला सय्यद गुरुजी साहित्य अकादमीच्या वतीने,शिक्षक दिनाच्या निमित्ताने ५१ पुस्तकाची पेटी सप्रेम भेट देण्यात आली,यावेळी सय्यद गुरुजी यांचे सहकारी शिक्षक गंगाधर भागवत गुरुजी बोलत होते.यावेळी महाराष्ट्र शासन आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रल्हाद यशवंत काळे आणि राजेंद्र लाड,संतोष दाणी, मु.अ.प्रकाश सातपुते,सतीश कोल्हे,गोरक्षनाथ लाड यांची भाषणे झाली.सर्व शिक्षकांचा यावेळी आदरपूर्वक सन्मान करण्यात आला.विवेकानंद शिक्षक पुरस्काराबद्दल संतोष दाणी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मु.अ.शेख मॅडम,सहशिक्षक जयश्री मासाळकर,अनिता वायकर, सोले मॅडम,फिजा शेख मॅडम,सविता हुलजुते,राजेंद्र नवगिरे,डॉ.सय्यद हुमायुद्दीन, डॉ.सय्यद वलीयुद्दीन उपस्थित होते.सय्यद गुरूजी साहित्य अकादमीचे कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांनी सर्वांचे आभार मानले.

# भोजेवाडी येथे श्री.संत बाळूमामा यांची मूर्ती प्राणप्रतिष्ठा उत्साहात

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मौजे भोजेवाडी हे छोटेसे गाव वस्ती असलेल्या वाडी नेहमीच कोणत्या ना कोणत्या धार्मिक उपक्रमाने चर्चेत येत असते अशाच प्रकार दि.३ सप्टेबर पासुन तब्बल लगातार तीन दिवस उपक्रम घेऊन प्रथम दिवशी सार्वजनिक श्री संत बाळूमामा मूर्ती मिरवणूक सोहळा द्वितीय दिवस सुरनरवाडी गावातील तरुणांचा गजे हा पारंपारिक पद्धतीचा खेळाचा कार्यक्रम व तृतीय दिवस सकाळी कलश पूजन मूर्ती स्थापना व ह.भ.प सुरेशानंद महाराज शास्त्री यांचे कीर्तन व याच दिवशी सायंकाळी ह. भ.प.श्रीराम महाराज गुलदगड यांचे कीर्तन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.. हे गाव खूप छोटे आहे पण सार्वजनिक कामात तसेच धार्मिक कार्यक्रमात नेहमीच एकजुटीने अग्रेसर राहून या



भोजेवाडी येथे श्री.संत बाळू मामा यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा स्थापना करुन कलशाहोरन समारंभ सोहळा दि.५सप्टेबर रोजी उत्साहात पार पडला या सांगता प्रसंगी ह.भ.प.सुरेशानंद महाराज शास्त्री यांचे किर्तन व रात्री गुलगदगड यांचे किर्तन होऊन या धार्मिक कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी सर्व मौजे भोजेवाडी येथे ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# रक्तदान हेच महादान -पांडुरंग जुजगर

## कोष्टी गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान व आरोग्य शिबिर संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

जुजगर गल्ली माजलगाव येथील कोष्टी गणेश मंडळाच्या वतीने आज गुरूवार दि. ४ सप्टेंबर रोजी सामाजिक जाणीव ठेवून रक्तदान शिबीर व आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला.

या रक्तदान शिबिरात तब्बल १६ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर आरोग्य शिबिराचा शेकडो रुग्णांनी लाभ घेतला. यावेळी बोलताना कोष्टी गणेश मंडळाचे मार्गदर्शक श्री. पांडुरंग जुजगर म्हणाले की, रक्तदान हेच महादान असून एका थेंबातून एखाद्याला नवजीवन मिळते. महाराष्ट्रात सध्या रक्ताची कमतरता आहे, त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीने रक्तदान करण्याची जाणीव ठेवली पाहिजे.

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी कोष्टी गणेश मंडळाने सामाजिक जाणिवेतून विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प केला असून त्याच अनुषंगाने रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीराचे



आयोजन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांना सामाजिक उपक्रमात सहभागी करून घेण्याचा उद्देश असल्याचे मंडळाच्या पदाधिकार्यांनी सांगितले.

या शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवम तोष्णीवाल, लॅब टेक्नीशियन दिनेश गिरी, डॉ. अंकित शिंदे, प्रशांत धुमाळ यांनी सहकार्य केले. सर्व रक्तदाते, रुग्ण व शिबिराला सहकार्य करणार्या मंडळाच्या सर्व सदस्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

# आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर ; रामनाथ गुंजाळ यांचा शिक्षक बांधवांच्या हस्ते सत्कार

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील लमाणवाडी (जोमदरा) येथील सहशिक्षक रामनाथ ज्ञानदेव गुंजाळ यांना यंदाचा स्वामी विवेकानंद पतसंस्थेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला असून, या यशाबद्दल त्यांचा शिक्षक बांधवांनी जाहीर सत्कार करून गौरव केला.**



गुंजाळ सर गेल्या सात वर्षांपासून लमाणवाडी शाळेत कार्यरत असून, या कालावधीत त्यांनी शाळेचा सर्वांगीण कायापालट घडवून आणला आहे. केंद्रीय मुख्याध्यापक दादासाहेब चितळे व लमाणवाडी शाळेचे मुख्याध्यापक बाबासाहेब वामन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी शाळेत हस्ताक्षर स्पर्धा, आदर्श परिपाठ, आनंददायी शनिवार, विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा, निसर्ग सहल असे अनेक उपक्रम राबवले. शाळेत 'स्वच्छ मिशन', 'एक पेड़ माँ के नाम' अशा मोहिमांमध्येही सक्रिय सहभाग नोंदवून शालेय परिसर सुशोभित करण्यात आला. आज या शाळेतील मुले इंग्रजी वाचनासोबत मराठी वाचनातही प्रावीण्य मिळवू लागली आहेत, हे शाळेच्या प्रगतीचे मोठे यश मानले जात आहे. गुंजाळ सरांनी यापूर्वी आष्टी तालुक्यातील बीड सांगवी, लामण तांडा, देऊळगाव, पिंपळगाव घाट या शाळांमध्ये शिक्षक म्हणून कार्य केले आहे. ज्या शाळेत त्यांनी सेवा दिली त्या ठिकाणी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्तेसोबत शिस्त, सुसंस्कार, आत्मविश्वास या मूल्यांचा विकास होण्यासाठी प्रयत्न केले. मुख्याध्यापक बाबासाहेब वामन व सहशिक्षक रामनाथ गुंजाळ यांच्या पुढाकारातून लमाणवाडी शाळेची रंगरंगोटी, भौतिक सुविधा उभारणी, वृक्षारोपण, परिसर सुशोभीकरण करण्यात आले आहे. एका डोंगराळ व दुर्गम भागातील ही शाळा आज तालुक्यात आदर्श ठरत आहे. स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्काराने गुंजाळ सरांच्या कार्याची दखल घेतली गेली आहे. या पुरस्कारामुळे संपूर्ण लमानवाडी जोमदरा परिसर तसेच आष्टी तालुक्यात अभिमानाची भावना व्यक्त होत असून, शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थी यांच्यात आनंदाचे वातावरण आहे.रामनाथ गुंजाळ सर यांना स्वामी विवेकानंद पतसंस्थेचा यंदाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी बाबासाहेब ठोंबरे सर, विजय कोकाटे सर, महादेव आमले सर, प्रवीण धोंडे सर, उमाकांत तांदळे सर व भगवान बोडके सर उपस्थित होते.

# पोलिस अधीक्षक काँवत यांच्या हस्ते गुणवंतांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद , बीड व तायक्वांदो असोसिएशन ऑफ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा, बीड - २०२५ समारोपप्रसंगी पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते राष्ट्रीय तायक्वांदो खेळाडूंसह गुणवंतांना गौरविण्यात आले.

जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे पार दिनांक ३ व ४ सप्टेंबर २०२५ रोजी दोन दिवस जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धा पडली. ४ सप्टेंबरला गुरुवारी जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेचा समारोप करण्यात आला. या प्रसंगी जागतिक तायक्वांदो दिनाचे औचित्य साधून स्पर्धेतील विजेते खेळाडू , राज्य - राष्ट्रीय खेळाडू , क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू , प्रशिक्षक व राष्ट्रीय पंचांना जिल्हा पोलीस अधीक्षक मा .श्री . नवनीत कॉवत साहेब यांच्या हस्ते



जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धाचा समारोप

सन्मानित करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अरविंद विद्यागर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा प्रमुख क्रीडा अधिकारी श्री अनिकेत काळे, क्रीडा संघटक प्रा .दिनकर थोरात सर, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र , मुंबई राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे सर यांच्या उपस्थितीत हा समारोप समारंभ पार पडला .

या कार्यक्रमासाठी क्रीडा अधिकारी श्री. कालिदास होसुरकर, श्री. जितू आराक, श्री. योगेश कारंडे , जया बारगजे यांच्यासह तायक्वांदो खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा क्रीडा पुरस्कार विजेत्या जया बारगजे , बन्सी राऊत सर, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक विजेती कु. नयन बारगजे हिच्यासह राष्ट्रीय खेळाडू ओमकार परदेशी, कु. यशस्वी चव्हाण, कु. कार्तिकी मिसाळ ,श्रवण तांबारे, पारस गुरुखुदे, प्रणवकुमार शिरसाठ, देवेंद्र जोशी, राष्ट्रीय पंच शेख अनिस, ऋत्विक तांदळे , रंजीत काकडे, बाळासाहेब आंधळे, शकील शेख ,बालाजी कराड या पंचांचा सत्कार यावेळी करण्यात आला. जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेचे नियोजन व शिस्तबद्ध आयोजनासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय, बीड व तायक्वांदो प्रात्यक्षिकांचे पोलीस अधीक्षक मा .श्री नवनीत कॉवत साहेब यांनी कौतुक केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## टी.सी.हरवला आहे

सुमित नवनाथ ढाकणे नावाचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारुळ ता.केज या शाळेत शिक्षण घेतलेला इयत्ता ४ थी पासचा मुळ टि.सी. दि. ०१ /०८ /२०२५ रोजी केज ते धारुर प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

-::संपर्क::-

मो.नं.- ८३८०९१००२९

cmyk

# कांद्याला भाव नसल्याने शेतकरी अडचणीत

## सरकारला मात्र ग्राहकांची काळजी, अवघ्या २४ रूपये दराने विक्री सुरू

पुणे : देशातील बाजारात कांद्याचे भाव दबावात आहेत. कांद्याला ११०० ते १४०० रुपयांच्या दरम्यान सरासरी भाव मिळत आहे. असे असताना देखील सरकार बाजारात कांद्याचे भाव कमी करण्यासाठी २४ रुपये किलोने कांदा विकत आहे. मोठ्या ६ शहरांमध्ये कांदा विक्रीचे नियोजन सरकारने केले आहे.

सध्या बाजारात ग्राहकांना २८ ते ३० रुपये किलोने कांदा मिळत आहे. असे असतानाही केंद्रीय ग्राहक व्यवहारमंत्री प्रल्हाद जोशी यांनी २४ रुपये किलोने कांदा विक्री सुरु केली. दल्ली, मुंबई आणि अहमदाबाद येथे कांदा विक्री सुरु केली आहे शिवाय चेन्नई, गुवाहाटी आणि कोलकाता येथे कांदा विक्री सुरु होणार आहे. कांद्याचे भाव दबावात असतानाही सरकार कांदा विक्री करत असल्याने शेतकरी अडचणीत येणार आहेत. देशात यंदा कांद्याचा बाजारभाव दबावातच आहे. कांद्याला उत्पादन खर्चाच्या दरम्यान भाव मिळाला. मार्च महिन्यात रब्बी कांद्याची आवक जोमात सुरु होती. कांद्याची लागवड वाढल्याचे आकडे पुढे आल्यानंतर दरावर आणखी दबाव आला होता.



कांदा ८०० ते १२०० रुपयांच्या दरम्यान बहुतांशी काळ राहीला. मागील काही दिवसांपासून कांदा सध्या ११०० ते १४०० रुपयांच्या दरम्यान विकला जात आहे. काही बाजारांमध्ये तर किमान दर आजही ७०० रुपयांपासून सुरु होत आहे. तर कमाल दर काही बाजारांमध्ये १८०० रुपयांच्या दरम्यान आहे. परंतु हा दर मिळत असलेले बाजार कमीच आहेत. जून महिन्यात काही दिवस कांद्याचा भाव १६०० ते १८०० रुपयांवर गेला होता. मात्र बाजारातील आवक आणखी वाढून दर पुन्हा दबावात आले. यंदा कांद्याची टिकवणक्षमता कमी झाली आहे. कांद्याला पोषक वातावरण यंदा नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. यंदा मार्च आणि एप्रिल महिन्यात उष्णता जास्त होती. या महिन्यांमध्ये कांद्याची काढणी मोठ्या प्रमाणात सुरु होते. वाढलेल्या उष्णतेचा पिकाला फटका बसला. मे महिन्यातही पहिल्या आठवड्यात ऊन जास्त होते. उष्णतेमुळे कांदा पिकाचे नुकसान झाले. एप्रिलच्या शेवटी आणि मे महिन्यात काढलेला कांदा शेतकऱ्यांनी शेतात सुकविण्यासाठी ठेवला होता. याच काळात पाऊस सुरु झाला. सुकवण्यासाठी ठेवलेला कांदा भीजून पिकाचे नुकसान झाले. तसेच तापमानात अचानक घट झाल्याने चाळीत ठेवलेल्या कांद्यावरही परिणाम झाला. जून महिन्यातही काही दिवस ढगाळ वातावरण राहून काही दिवस पुन्हा ऊन होते. जुलै महिन्यातही अशीच परिस्थिती राहीली. यामुळे कांद्याच्या टिकवणक्षमतेवर परिणाम झाला. चाळीतील कांद्याचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना नाईलाजाने कांदा विकावा लागत आहे. त्यामुळे बाजारातील आवक चांगली असून कांद्याचे भाव दबावात आहेत. असे असताना सरकार मात्र शेतकऱ्यांचा नाहीतर ग्राहकांचा विचार करताना दिसत आहे.

## भेंडीवर फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आणि नियंत्रण



भेंडी पिकावर शेंडे व फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव वाढतांना दिसून येतो. या किडीमुळे पिकाचे ४० टक्केपर्यंत नुकसान होऊ शकते. शेतकरी बांधवांनी योग्य वेळी कीड नियंत्रणाच्या एकात्मिक पद्धतीचा अवलंब केल्यास हे नुकसान टाळता येणार आहे.

फळ पोखरणाऱ्या अळीमुळे होणारे नुकसान : वर्षभर कार्यक्षम असणाऱ्या या किडीला जास्त आर्द्र व उष्ण तापमान पोषक ठरते. या किडीची अळी अंड्यातून बाहेर निघाल्यानंतर कोवळ्या शेंड्याना पोखरून आत जाते. प्रादुर्भावग्रस्त पोंगा मलूल होऊन खालच्या दिशेने लोंबतो व नंतर वाळतो. अळीने पोखरलेल्या कळ्या व फुले वाळून खाली पडतात. फळावर अळीने केलेले छिद्र आणि तिची विष्ठा दिसते, तर प्रादुर्भावग्रस्त फळे विकृत आकाराची होतात. फळांची वाढ होत नाही. अशी फळे विक्री योग्य राहत नाहीत.

अळीचे एकात्मिक नियंत्रण : कीडग्रस्त फळे तोडून अळीसह नष्ट करावे. अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टरी लावावेत. तसेच एकरी १० पक्षी थांबे लावावेत. सुरवातीच्या अवस्थेत रासायनिक कीटकनाशकाऐवजी ढालकिडा, क्रायसोपा, सिरफिड माशी, भक्षक ढेकूण या मित्र कीटकांमार्फत अळीचे नियंत्रण करावे. ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अ‍ॅझाडिरेक्टीन (३०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी. वातावरणात आर्द्रता असल्यास बिव्हेरिया बॅसियाना (१ टक्के डब्ल्यूपी) १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी केल्यास शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीचे प्रभावी व्यवस्थापन होईल. एचएएनपीव्ही (२५० एलई) या विषाणूजन्य कीटकनाशकाची ०.५ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणे सायंकाळी फवारणी करावी. रासायनिक कीटकनाशकाची फवारणी फक्त किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर खालीलप्रमाणे फवारणी करावी. शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीसाठी इमामेक्टीन बेन्झोएट (५ एसजी) ०.२७ ग्रॅम किंवा लॅंबडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) ०.६ मिलि मिली प्रति लिटर पाणी फवारणी करावी.

## खजूर शेती : शेतकऱ्यांना फायदेशीर ठरणारा मार्ग

आखाती देशांमध्ये खजूर पिकवले जातात असे म्हटले जाते. मात्र आता तुम्ही तुमच्या अंगणात खजूर लावू शकता. भारतात, खजूरची व्यावसायिक लागवड दिवसेंदिवस वाढत आहे. खजूर हे अत्यंत पौष्टिक फळ आहे आणि ते साखर, कॅल्शियम आणि निकोटिनिक आम्ल, लोह आणि पोटॅशियमचे उत्कृष्ट स्रोत आहेत. इराण हा जगातील पहिल्या क्रमांकाचा खजूर उत्पादक आणि निर्यातदार देश आहे. भारतातील शेतकरी खजूर शेती करून चांगले उत्पन्न मिळवू शकतात. आता बऱ्याची ठिकाणी याची लागवड करू लागले आहेत.

खजूरचे आरोग्य फायदे : खजूर बद्धकोष्ठता दूर करण्यास आणि आतड्यांच्या हालचाली नियंत्रित करण्यास मदत करतात. खजूर हृदयाचे आरोग्य सुधारण्यास आणि हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करतात. खजूर अतिसार नियंत्रित करण्यास मदत करतात. खजूर लोहाच्या कमतरतेमुळे होणारा अशक्तपणा रोखण्यास मदत करतात. खजूर रक्तदाब कमी करण्यास मदत करतात. खजूर लैंगिक आरोग्य वाढवण्यास मदत करतात. खजूर श्वसन आणि पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात. खजूर गरोदरपणात आणि प्रसूतीमध्ये मदत करतात. संधिवाताच्या रुग्णांना खजूर मदत करतात. खजूर कोलायटिसचा धोका कमी करण्यास मदत करतात. खजूर कोलन कर्करोग रोखण्यास मदत करतात. खजूर वजन वाढवण्यास मदत करतात.

भारतातील स्थानिक नावे : खजूर (हिंदी), खेजूर (बंगाली), खजुरा (ओरिया), खजूर (मराठी), खजूर (गुहारी), खजूरा पांडू (तेलुगु) पेरीचम पाझम (तमिळ), एथा पझम (मल्याळम), खजूरा (कन्नड), कासेज (कन्नड). भारतात खजूरच्या व्यावसायिक जाती : १००० हून अधिक खजूराच्या जाती अस्तित्वात आहेत. येथे काही व्यावसायिकरित्या लागवड केलेल्या खजूराच्या जाती आहेत. बारही, मेडजूल, शमरान (सायर), खदारावी, हलावी, जाहिदी, खालस, जंगली खजूर. खजूर लागवडीसाठी हवामानाची आवश्यकता : खजूरांना त्यांच्या चांगल्या वाढीसाठी कमी सापेक्ष आर्द्रता आणि भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक असतो. भरपूर सूर्यप्रकाश असलेले लांब दिवस, रात्रीचे तापमान आणि दंव नसलेले हिवाळ्यातील दिवस आवश्यक असतात. विशेषतः फुले येण्याच्या आणि फळधारणेच्या वेळी त्यांना पाऊस आवडत नाही.



## पावसाळ्यात शेळ्यांचे असे करा व्यवस्थापन

आपल्या देशात अनेक शेतकरी हे शेळीपालन करतात. शेळीपालन व्यवस्थापनात सर्वांत जास्त काळजी ही गोठ्यात असणारी आर्द्रता कमी करण्यासाठी घ्यावी लागते. शेळ्यांना आर्द्रता सहन होत नाही, त्यामुळे त्यांना श्वसनसंस्थेचे रोग होण्याची दाट शक्यता असते. पावसाळ्यात आद्रतेचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे व्यवस्थापनात त्यानुसार बदल करणे गरजेचे आहे. यामुळे याबाबत माहिती असणे गरजेचे असते. यासाठी व्यवसायात असणारी जागरूकता महत्त्वाची असते.

अशी घ्या काळजी :शेळीच्या शरीरावर कोणत्याही प्रकारचा ताण वाढणार नाही याची काळजी घ्यावी. कळपातील सर्व शेळ्यांना जंतुनाशक औषधे द्यावीत. त्यामुळे कळप जंतमुक्त राहू शकेल. पाऊस पडल्यानंतर निर्माण झालेली आर्द्रता आणि उष्णता जंतांची अंडी, गोचीड वाढीसाठी अनुकूल असते. अशावेळी शेळ्यांच्या अंगावर गोचीड होतात. त्यामुळे शेळ्यांना रोग होतात गोचीड शेळ्यांच्या शरीरातील रक्त शोषतात. त्यामुळे शेळ्या अशक्त होतात.

अंगावर खाज सुटते, त्यामुळे शेळ्या बैचेन होतात, खाणे बंद करतात, हालचाल मंदावते यावर उपाय म्हणून शेळ्यांच्या अंगावर गोचीड प्रतिबंधक औषध लावावे किंवा गोठा धुऊन घ्यावा. पावसाळ्याच्या दिवसात शेळ्यांना बाहेर सोडू नये.



पावसात जास्त वेळ शेळी भिजली की न्यूमोनियासारखा आजार होतो. यामुळे शेळी शिंकते, नाकातून चिकट पांढरा पिवळसर द्रव वाहतो, ताप येतो, धाप लागते. कोवळ्या चाऱ्यामध्ये तंतुमय पदार्थ कमी असतात, जास्त प्रमाणात हा चारा खाल्यामुळे शेळ्यांना अपचन होते. पोटफुगी, हगवणीसारखे आजार होतात. पोटफुगी होऊ नये यासाठी गोडे तेल आणि खाण्याचा सोडा पाजला तर पोटफुगी कमी होते.

गोठ्यातील आद्रता कमी ठेवण्यासाठी उपाय :

शेळ्यांना आर्द्रता अजिबात सहन होत नाही, त्या उष्णता सहन करू शकतात. गोठ्यातील आद्रता कमी ठेवण्यासाठी गोठ्यात रात्रीच्या वेळी शेगडी लावावी अथवा ६० वॉटचा विजेचा बल्ब रात्रभर लावून ठेवावा. गोठ्यातील मलमूत्र रोजच्या रोज साफ करून गोठा कोरडा ठेवावा गोठ्यातील जमीन जर ओली असेल तर शेळ्यांच्या पायाच्या खुरामध्ये ओलसर पणा राहून पायाला फोड येतात, यामुळे शेळ्या लंगडतात, ताप येतो, चारा कमी खाते अन अशक्त होतात.

लसीकरण महत्त्वाचे :आंत्रविषार होऊ नये म्हणून लसीकरण करावे. फुफ्फुसदाह आजार गोठ्यातील चुकीच्या व्यवस्थापनामुळे होतो. नियंत्रणासाठी लसीकरण महत्त्वाचे ठरते. लाळ्या खुरकूत आजाराचा प्रसार वेगाने होतो. यासाठी लसीकरण महत्त्वाचे ठरते. पावसाळ्यातच घटसर्प आणि फऱ्या आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते खबरदारीचा उपाय म्हणून लसीकरण करून घ्यावे.

गाभण शेळीची योग्य काळजी : गाभण शेळीची पावसाळ्यात योग्य प्रकारे काळजी घ्यावी, पावसाळ्यात गोठ्याची जमीन ओलसर राहते, त्यामुळे चालताना घसरून पडणे हा प्रकार आढळतो त्यामुळे गर्भपात होण्याची शक्यता असते. पावसाळ्यात शेळ्या विण्याचे प्रमाण अधिक असते. या काळात गर्भाशयाचे तोंड उघडे असते, जर योनी भाग व बाजूचा भाग स्वच्छ नसेल, तर गर्भाशयात जंतूंचा शिरकाव होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी विल्यानंतर पाठीमागचा भाग गरम पाणी व सौम्य जंतुनाशकाचा वापर करून धुऊन काढावा. स्वच्छता ठेवावी.




### महत्वाच्या घटना

१५८३ : अमेरिका सर हम्फ्रे गिल्बर्ट यांनी उत्तर अमेरिकेत पहिली इंग्रजी वसाहत स्थापन केली
१८६१ : अमेरिकन सैन्यातील चाबकाचे फटके मारण्याची शिक्षा बंद करण्यात आली.
१९१४ : ओहायो मध्ये पहिले इलेक्ट्रिक ट्रॅफिक सिगनल बसवले.
१९६२ : कन्या नक्षत्रात पहिल्या 'क्वासार' तार्याचं अस्तित्त्व सिद्ध करण्यात यश
१९६२ : नेल्सन मंडेला यांना तुरुंगात टाकण्यात आले. यानंतर १९९० मधे त्यांची सुटका झाली.
१९६३ : शीतयुद्ध आंशिक आण्विक चाचणी बंदी करार: अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सोव्हिएत युनियनने स्वाक्षरी केली.
१९६५: पाकिस्तानी सैन्याने साध्या वेषात घुसखोरी केल्यामुळे भारत पाकिस्तान युद्धाला सुरूवात झाली.
१९७३ : मार्स ६ अंतराळयान यूएसएसआर वरून प्रक्षेपित झाले.
१९९४ : इंडियन नॅशनल सायन्स अ‍ॅकेडमी तर्फे दिला जाणारा 'होमी जहांगीर भाभा पुरस्कार' राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेले संचालक प्रा. इरोड सुब्रमणियन राजगोपाल यांना प्रदान
१९९७ : फ्रेन्च खुल्या लॉनटेनिस स्पर्धेत मिश्र दुहेरी गटात विजेतेपद मिळवणार्या महेश भूपतीला क्रीडा खात्यातर्फे २ लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर
१९९७ : रशियाच्या दोन अंतराळवीरांना घेऊन 'सोयूझ-यू' हे अंतराळयान 'मीर' अंतराळस्थानकाकडे रवाना
२०१६ : ब्राझिलमधे रिओ-डी-जानिरो येथे ३१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात होणार आहे.
२०१९ : भारत जम्मू आणि काश्मीर या परदेशाला राज्यचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू आणि काश्मीर, व लडाख असे विभाजन करण्यात आले.
२०२० : राम मंदिर, अयोध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विवादित जमिनीवर मंदिर बांधण्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर भूमिपूजन करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५० : फ्रेंच लघुकथाकार व लेखक गाय दी मोपासां यांचा जन्मदिन.
१८५२ : ब्रिटीश कालीन भारतातील उडीसा राज्यातील राष्ट्रवादी स्वातंत्रता सेनानी आचार्य प्यारे मोहन यांचा जन्मदिन.
१८५८ : वासुदेव वामन तथा 'वासुदेवशास्त्री' खरे इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी (मृत्यू: ११ जून १९२४)
१८९० : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार इतिहासकार, लेखक, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू १९६१-१९६४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू १९४८, पद्मविभूषण, मराठी शुद्धलेखन महामंडळाचे अध्यक्ष, प्राचीन मराठी इतिहास आणि मराठ्यांचा इतिहास यांचे व्यासंगी (मृत्यू: ६ आक्टोबर १९७९)
१९०१ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१५ : पद्मश्री, पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार, सन्मानित प्रख्यात हिंदी कवी व शिक्षणतज्ञ शिवमंगल सिंग 'सुमन' यांचा जन्मदिन.
१९३० : नील आर्मस्ट्रॉंग चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (मृत्यू: २५ ऑगस्ट २०१२)
१९३३ : विजया राजाध्यक्ष लेखिका व समीक्षिका, ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा
१९४७ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी वीरेन डंगवाल यांचा जन्मदिन.
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी महेंद्र कर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)
१९६९ : वेंकटेश प्रसाद जलदगती गोलंदाज
१९७२ : अकिब जावेद पाकिस्तानी जलदगती गोलंदाज
१९७५ : काजोल अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८८२ : लुई (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म:८६३)
१८९५ : जर्मन तत्त्ववेत्ता, इतिहासकार, साम्यवादी, सामाजिक शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार आणि व्यवसायिक फ्रेडरिक एंगेल्स यांचे निधन.
१९५० : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वतंत्रता सेनानी व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचे निधन.
१९६२ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांनी गोळी झाडुन घेऊन आत्महत्या केली. (जन्म: १ जून १९२६)
१९८४ : रिचर्ड बर्टन अभिनेता (जन्म: १० नोव्हेंबर १९२५)
१९९१ : होंडा कंपनी चे स्थापक सुइचिरो होंडा यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर १९०६)
१९९२ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (जन्म: ५ फेब्रुवारी १९०५)
१९९७ : के. पी. आर. गोपालन स्वातंत्र्यसैनिक, कम्युनिस्ट व नक्षलवादी नेते (जन्म: )
२००० : लाला अमरनाथ भारद्वाज भारतीय क्रिकेटचे भीष्माचार्य, स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार व स्वतंत्र भारताचे पहिले शतकवीर
२००१ : ज्योत्स्ना भोळे संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६), विष्णूदास भावे पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, महाराष्ट्र विशेष गौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: ११ मे १९१४)
२०१४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार चापमॅन पिंचर यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९१४)

# आदिवासी समाजातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करा - जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदि कर्मयोगी अभियान योजनेच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील २४ गावातील आदिवासी समाजाच्या नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहत आयोजित प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान बैठकी दरम्यान त्या बोलत होत्या. यावेळी बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम., जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चौधर, उप मुख्य कार्यकारी पंचायत उदयसिंग राजपूत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन आर. डी. तुबाकले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता एल. बी. बारगिरे, प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी संबंधित विभागातील अधिकारी यांना सदर योजनेंतर्गत पुढील प्रमाणे सामुहिक विकासाच्या




योजना राबविणे अपेक्षीत असल्याचे सांगितले. यामध्ये आवास योजना, जल अपुर्ती साधने विहिरी, हॅन्डपंप, ट्युबवेल, पाण्याच्या टाक्या, जलाशये, नहरे इत्यादी, आरोग्य व पोषण, शिक्षण, रस्ते व दळणवळण, वीजेची जोडणी, सामुदायीक व धार्मिक सुविधा मध्ये मंदीर, मस्जिद, चर्च किंवा अन्य धार्मिक स्थळे विकास, दूरसंचार साधनामध्ये टपालघर, टेलीफोन बुथ, मोबाईल टॉवर, रेडीयो सूचना बोर्ड, बाजारपेठ व व्यापार साधने, स्वच्छतागृहे, सामुदायीक शौचालये, मलनिस्सारण योजना, कृषि सहायता मध्ये पशुशाला, अन्न गोदाम, सिंचन पंपाचे दुरुस्ती, मनोरंजन यामध्ये खेळ मैदान, सांस्कृतिक सण साजरे करण्याचे ठिकाण, मोकळे मैदानाचा विकास सेवा साधने यांचा लाभ संबंधित लाभार्थींना उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगितले. तसेच तालुका मास्टर ट्रेनरची नियुक्ती करून जिल्हा प्रोसेस लॅब गठीत करणे, अनुसूचित जमाती मधील विद्यार्थांसाठी वसतीगृह उभारणीचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना सादर करणेबाबत निर्देश दिले, दूरसंचार विभागाने संबंधित गावामध्ये दूरसंचार जोडणीबाबत तातडीने सर्वेक्षण करून प्रस्ताव सादर करावा. सदरील कार्यक्रमाशी संबंधित सर्व सहभागी यंत्रणांनी एकत्रितपणे गावनिहाय शिबीरांचे आयोजन करुन, लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा. आदिवासी समाजातील कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष मोहीम राबविणेबाबतच्या सूचना ही श्रीमती मित्तल यांनी यावेळी दिल्या.यावेळी तहसीलदार परतुर श्रीमती प्रतिभा गोरे, जिल्हा कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगिता भागवत, गटविकास अधिकारी परतुर एन.टी.खिल्लारे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी आय. सी. डी. एस. श्रीमती कोमल कोरे, गटविकास अधिकारी भोकरदन महेंद्र साळवे, गटविकास अधिकारी अंबड ज्योती लबडदेवी, गटविकास अधिकारी बदनापूर ज्योती राठोड, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. पी. डी. चौधरी, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद जालना पी. बी. बनसावडे, यांच्यासह अन्य विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# माजी आ. राजेशभैय्या टोपे यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार



जालना। प्रतिनिधी

तलवारबाजी आणि कुस्तीमध्ये विजय मिळवत यश मिळविणाऱ्या अंकुशराव टोपे महाविद्यालयातील खेळाडूंचा माजी मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी या खेळाडूंचे कौतूक करून टोपे यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

क्रीडा युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये अंकुशराव टोपे महाविद्यालयातील विद्यार्थी विनायक किनकिने यांनी तलवारबाजी स्पर्धेमध्ये १९ वर्षा आतील वयोगटामध्ये प्रथम क्रमांक आणि संतोष खंडाळे यांनी कुस्ती स्पर्धेमध्ये ग्रीक रोमन प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. या यशाबद्दल माजी आरोग्यमंत्री तथा मस्त्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. आ. राजेश भैय्या टोपे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी राजेशभैय्या टोपे यांनी महाविद्यालयाचे नाव उंचावले याबद्दल विजेत्या खेळाडूचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर गायकवाड, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भुजंग डावकर, डॉ. रामदास वैद्य, कार्यालयीन अधीक्षक सुरेश चव्हाण, प्रा. चंद्रकांत लाटेकर आदी उपस्थित होते.

# सार्वजनिक आरोग्य विभागाने शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी – राजेश टोपे

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हयासह राज्यभरातील राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी गेल्या १७ दिवसांपासून आपल्या विविध न्याय्य मागण्यांसाठी बेमुदत आंदोलन करत आहेत. जिल्हा परिषद, जालना येथे सुरू असलेल्या आंदोलनाला माजी सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी भेट दिली. यावेळी माजी मंत्री राजेश टोपे यांनी शासनाने अधिकारी व कर्मचारी यांच्या मागण्या त्वरित मंजूर करून आंदोलनामुळे विस्कळीत झालेली ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सुरळीत करावी याबाबत राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री



मा.ना.प्रकाशरावजी आबिटकर यांच्याशी दुरध्वनी संवाद साधला.

यावेळी बोलतांना माजी मंत्री राजेश टोपे म्हणाले की, या आंदोलनात, डॉक्टर्स, नर्सेस, आरोग्यसेविका, आरोग्य सेवक, समन्वयक, सहाय्यक सहभागी झाले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा ठप्प झाली आहे. दहा वर्षापेक्षा अधिक काळ सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करण्याचा शासन निर्णय (जीआर) १४ मार्च २०२४ रोजी काढण्यात आला परंतु १८ महिने होऊनही अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याने कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने ८ व १० जुलै २०२५ रोजी शासन प्रतिनिधीसोबत चर्चा केली, त्यातूनही काहीच तोडगा निघाला नाही त्यामुळे अखेर या कर्मचाऱ्यांनी १९ ऑगस्ट २०२५ पासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे, सेवेत कायम करणे, मानधन वाढवणे, ईपीएफ, बोनस, आणि बदली धोरणाबाबत या कर्मचाऱ्यांनी मागण्या आहेत, त्या मागण्या नियमानुसार असल्यामुळे शासनाने याबाबत त्वरित धोरण ठरविणे आवश्यक आहे, शासनाने सदरील कर्मचाऱ्यांच्या मागण्या मंजूर करून ग्रामीण भागात विस्कळीत झालेली आरोग्य सेवा नियमित करणेबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा.असे माजी मंत्री राजेश टोपे म्हणाले.

# अहिल्यानगर– पुणे महामार्गावर बस व ट्रॅक्टरची धडक; दोघांचा मृत्यू, तिघे जखमी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर- पुणे महामार्गावर चास (ता. अहिल्यानगर) शिवारात गुरूवारी (४ सप्टेंबर) पहाटे भीषण अपघात झाला. भरधाव वेगातील खासगी आरामबसने ट्रॅक्टरला धडक दिल्याने ट्रॅक्टर ट्रॉली पलटी होवून त्यातील दोन मजूरांचा मृत्यू झाला असून तिघे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर नगरमधील खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघातात शमीम अख्तर (रा. बिहार) व इनारूल शेख (रा. पश्चिम बंगाल) या दोघांचा मृत्यू झाला आहे. तर जखमींची नावे समजू शकली नाहीत. मयत व जखमी हे पाचही जण परप्रांतीय




असून मजुरी काम करण्यासाठी अहिल्यानगर तालुक्यात आलेले होते. ते पहाटेच्या सुमारास कामावर जाण्यासाठी चास कडून अहिल्यानगरकडे ट्रॅक्टर- ट्रॉली घेवून येत होते, पहाटे चासच्या पुढे जयेश हॉटेल जवळ आले असता पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या खासगी आराम बसने ओहरटेक करत असताना अचानक वळण घेतले, त्यामुळे बसची ट्रॅक्टरला धडक बसून ट्रॅक्टर- ट्रॉलीसह पलटी झाला. त्याखाली दबून दोघांचा मृत्यू झाला तर तिघे जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच अहिल्यानगर तालुका पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नागरिकांच्या मदतीने जखमींना रूग्णवाहिका बोलावून उपचारासाठी रूग्णालयात पाठविले तर मयतांचे मृतदेह शवविच्छेदना साठी जिल्हा शासकीय रूग्णालयात पाठविले. तसेच अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला काढून वाहतूक सुरळीत केली.

या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# संजय कारके यांचे निधन

अंबड । प्रतिनिधी

अंबड़ नगरपालिकातील सफाई विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी संजय वामनराव कारके वय ५२ वर्ष यांचे छत्रपती संभाजी नगर येथील घाटी रुग्णालयात औषध उपचार दरम्यान शुक्रवार दि. ५ सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास दुःखद निधन झाले आहे. त्यांना मेजर अटॅक आल्याने मेंदूची नस फाटली होती त्यावर अपेक्स रुग्णालयात ऑपरेशन झाल्यानंतर त्यांना घाटी रुग्णालयात हलविण्यात आले होते. घाटी रुग्णालयात औषध उपचार दरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे.

श्री संजय कारके हे रवींद्र कारके व राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके यांचे



सख्खे चुलत भाऊ आहेत. संजय कारके यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, सून, नातवंडे, चुलता चुलती चुलत भावासह मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने कारके परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांचा अंत्यविधी अंबड येथील मातंग समाज स्मशान भूमी मध्ये शुक्रवारी रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले.


# गावठी पिस्टल व सहा जिवंत काडतुसे जप्त

## स्थानिक गुन्हे शाखाची कारवाई

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हयात अवैध पिस्टल बाळगणारे ईसमांवर कार्यवाही करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने दिनांक ०५/०९/२०२५ रोजी अवैध अग्नीशस्त्र बाळगणारे ईसमांची माहिती घेत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, प्रविन संतोष तायडे वय २३ वर्ष रा. गोकुळवाडी ता. जि. जालना हा बेकायदेशीर रित्या गावठी पिस्टल स्वतःच्या ताब्यात बाळगत आहे .

खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन सदर ईसमाचा जालना शहरात शोध घेत असतांना खरपुडी चौफुली येथील इंडियन ढाबा समोर हा मिळुन आला त्यास शिताफीने ताब्यात घेऊन त्यास गावठी पिस्टल बाबत विचारणा केली असता त्याने सदर पिस्टल पंचासमक्ष काढुन दिल्याने एक गावठी वनावटीचे पिस्टल (अग्नीशस्त्र), ०६ जिवंत काडतुस जप्त करण्यात आले त्यास विश्वासात घेऊन त्यास गावठी पिस्टल पुरवणारे ईसमां बाबत विचारणा केली असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिल्याने त्याचे विरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना येथे कलम ३/२५ कलम भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार गोपाल गोशिक, लक्ष्मीकांत आडेप, प्रभाकर वाघ, भाऊराव गायके, रमेश राठोड, सागर बाविस्कर, सतीष श्रीवास, इरशाद पटेल, रमेश काळे, कैलास चेके, अशोक जाधवर यांनी केली आहे.



# रांगोळीतून व्यक्त केली गुरू प्रति कृतज्ञता; ८ विद्यार्थी बनले शिक्षक, विद्यार्थांना दिले धडे

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य डेंटल कॉलेज मध्ये ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गुरू शिष्यांचे नाते सांगणारी रांगोळी काढून गुरू प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. ऋषिकेश रासकर,हर्षली राठोड,उज्वला मुंढे,सारिका कापसे,प्रथमेश भोईर,निकिता जंगीद,ज्ञानेश जुत्ते,आकांक्षा मुलगीर,साहिल पोइंकार या विद्यार्थ्यांनी शिक्षण होऊन विद्यार्थांना ज्ञानदानाचे कार्य केले. माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करण्यात आले.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा,संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक दिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी



शिक्षकांविषयी असलेली निस्सीम आदर भावना विविध कार्यक्रमाद्वारे व्यक्त केली. मार्गदर्शन, संस्कार व मूल्यांचे बीज विद्यार्थ्यांच्या मनात पेरणाऱ्या आपल्या गुरुजनांबद्दल विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केली. शिक्षकांच्या योगदानामुळेच विद्यार्थी जीवनातील अंधार दूर होतो व ज्ञानाचा दीप उजळतो, हे सत्य सर्वांनी अधोरेखित केले. या प्रसंगी उपस्थित प्राध्यापकांनीही शिक्षक या संकल्पनेचा गाभा उलगडून सांगितला. ''शिक्षक हा केवळ विषय शिकवणारा नसून तो विद्यार्थ्यांच्या जीवनाचा मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. गुरुशिवाय जीवनात खरी प्रगती शक्य नाही,'' असे प्रतिपादन संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले शिक्षक दिन हा केवळ एक उत्सव नसून शिक्षकांच्या अमूल्य योगदानाचे स्मरण करण्याचा दिवस आहे, याची प्रचीती या कार्यक्रमातून पुन्हा एकदा आली. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले होते.यावेळी आदित्य डेंटल कॉलेज चे प्राचार्य डॉ.हिमांशू श्रीवास्तव , आदित्य आयुर्वेद चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप सानप, आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विकास गर्जे, आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.बालाजी बहिरवाल व सर्व महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि शिक्षकोत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील रेकॉर्डवरील ४७२ गुन्हेगार हद्दपार

जालना । प्रतिनिधी

सुरू असलेला गणेशोत्सव व ईद ए मिलाद च्या अनुषंगाने केलेल्या प्रतिबंधक कारवाईत प्रशासनाकडून सुमारे ४७२ गुन्हेगारांना हद्दपार करण्याचा आदेश काढण्यात आला आहे.

गणेशोत्सव हा हिंदु बांधवांचा सण मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत आहे. तसेच दिनांक ईद ए मिलाद हा मुस्लीम बांधवांचा एक महत्वाचा धार्मिक सणही याचवेही साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने मा.श्री. अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, यांनी दिलेल्या सुचना व आदेशा प्रमाणे विशेष कार्यकारी दंडाधिकारी आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक यांनी जालना जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार ज्यामध्ये हिंदु-मुस्लीम दंगली, हातभट्टी व देशी-विदेशी दारु विक्री करणारे रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार, दरोडे, जबरी चोरी असे गंभीर गुन्हे करणारे रेकॉर्ड वरील जिल्हयातील एकुण ४७२ आरोपीतांविरुध्द कलम १६३ (३) बीएनएसएस प्रमाणे ०७ सप्टेंबर पर्यंत हद्दपारीची कारवाई करण्यात आलेली आहे. ज्यात पोस्टे सदर बाजार ६३, कदीम जालना २१, तालुका जालना २१, चंदनझिरा ६६, बदनापुर १८, परतुर २४, मंठा ४०, आष्टी ०७, सेवली १६, मौजपुरी १३, भोकरदन ८५, जाफ्राबाद १७, पारध ३२, हसनाबाद ११, टेंभुर्णी ०५, अंबड १४, घनसावंगी १०, गोंदी ०३ आणि तिर्थपुरी ०६ अशाप्रकारे कारवाई करण्यात आलेली आहे.

# गोवंश हत्या बंदीनंतर कुरेशी समाज दुग्ध व्यवसायाकडे

## सिराज कुरेशींचे १२० लिटर दूध आष्टी दूध संघाला

आष्टी । प्रतिनिधी

महायुतीच्या सरकारने गोवंश हत्या कायदा कडक केल्याने आज आष्टी शहरांमध्ये होत असलेली गोवंश हत्या जवळपास ७० टक्के बंद झाल्याचे चित्र दिसत आहे कुरेशी समाज त्यांचा मूळ व्यवसाय खाटीक यापूर्वी शेतकऱ्यांकडून जरशी जातीचे घोरे वगारी तसेच भाकड गाई घेत होते हे देखील आता शासनाने गोवंश कायद्याची कडक अंमलबजावणी केल्यामुळे बंद झाले आहेत कुरेशी समाजापुढे आपला उदरनिर्वाह कुटुंब चालवण्यासाठी आता काहीतरी व्यवसाय केला पाहिजे हा प्रश्न उभा राहिला मग आता कुरेशी देखील दुग्ध व्यवसायाकडे वळल्याचे चित्र आष्टी शहरात पहावयास मिळत आहे आष्टी शहरातील कुरेशी मोहल्यातील सिराज उर्फ हिरो कुरेशी या कुरेशी समाजातील युवकांनी खडकत रोडवरील जोगेश्वरी मंगल कार्यालयाच्या बाजूला संकरित गाईंचा गोठा उभा करून आगदी सुधारीत पद्धतीने दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे या सिराज कुरेशी ने आज जवळपास १२० लिटर दूध आष्टी तालुका दूध संघाला वितरित करत आहे आज आमच्या प्रतिनिधींनी त्याच्याशी संवाद केला असता सिरास कुरेशी म्हणाला आम्हाला आता उदरनिर्वाह करता कुटुंब चालवण्यासाठी कुठला एखादा वेगळा व्यवसाय करण्याशिवाय गत्यंतर नव्हते मी दुग्ध व्यवसाय स्वीकारला आहे व तो आता व्यवस्थितपणे चालवत आहे मात्र माझी सरकारला विनंती आहे आम्ही वेगळा व्यवसाय करू मात्र शेतकऱ्यांची भाकड जनावरे जर्सी गाईला झालेली घोरे त्यांनी त्याचे काय करायचे हा त्यांच्याकडे मोठा प्रश्न भरायला आहे



# डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते महाकाल गणेश मित्र मंडळाची महाआरती

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील महात्मा फुले मार्ग शाहूनगर भागातील महाकाल गणेश मित्र मंडळाच्या वतीने श्री गणेशाची स्थापना करण्यात आली आहे. गुरुवार दि.४ सप्टेंबर रोजी सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते या मंडळाची महाआरती करण्यात आली. यावेळी विविध पदाधिकारी परिसरातील नागरिक, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड शहरातील महाकाल गणेश मंडळाच्या आरतीच्या निमित्ताने यावेळी विविध पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. अजित दादा पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, माजी सभापती भास्करराव जाधव, माजी न.प. उपाध्यक्ष शिवाजीराव जाधव, भाजपाचे शहर उपाध्यक्ष प्रकाश आनेराव, शिवसेनेच्या आहिल्यानगर संपर्कप्रमुख एड. उज्वला भोपळे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, संत सेना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गौतम नाना बिडवे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्याध्यक्षा शालिनी परदेशी यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार मंडळाचे अध्यक्ष कार्तिक चाळक, उपाध्यक्ष सुरज लवांडे, सचिव सुरज साळुंके, सदस्य प्रतीक पोरवाल, प्रबोध चोरमले, करण तंटे, कार्तिक मोहोळकर ,अवधूत बोंद्रे, निखिल चाळक, ऋषी साळुंके आदींनी केला. या वेळी डॉ. योगेश क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक राजेश साळुंके ,एड. विनायक जाधव, बाळासाहेब शिंदे, मोहन गोरे, नितीन साखरे, एड. धर्मेंद्र भोपळे आदींसह परिसरातील भाविक, युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# डॉ.विलास खरात यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

## अराजक हिंसक प्रवृत्तीला दिला कायद्याने दणका

आष्टी । प्रतिनिधी

डॉक्टर विलास खरात यांनी दिनांक ९ ऑगस्ट २० २५ रोजी फेसबुकवर हिंसाचार आणि राजकतेचे समर्थन करणारी पोस्ट टाकून समाजामध्ये देशाच्या विरुद्ध भडकवण्याचा प्रयत्न केला असल्याने त्यांचे विरुद्ध विरुद्ध दि.०४ सप्टेंबर २०२५ रोजी आष्टी पोलीस ठाण्यात अॅड. प्रबोधन निकाळजे यांच्या फिर्यादीवरून एफआयआर क्र. ४१३/२०२५ नुसार डॉ. विलास खरात याच्यावर भारतीय न्याय संहिता () २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे...

दि. ०९ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ. विलास खरात यांनी फेसबुकवर केलेल्या एका चिथावणीखोर पोस्टमुळे समाजात तणावाचे वातावरण निर्माण होऊ शकते, अशी तक्रार दाखल झाली होती. त्या पोस्ट मध्ये त्यांनी बांगला देश मध्ये निवडणूक आयोगा विरुद्ध तेथील नागरिकांनी हिंसाचार करून बांगलादेशाच्या माजी निवडणूक आयुक्त यांना ढाका, बांगलादेश येथे बुटांनी मारले " या मथळ्याची बातमी डॉ. विलास खरात यांनी त्यांच्या फेसबुक पेजवर पोस्ट व सार्वजनिक करून बांगलादेशी हिंसाचारी नागरिकांनी तेथे केलेल्या हिंसाचाराचे, हुकूमशाहीचे व अराजकतेचे पूर्णतः समर्थन करत "' ?" (भारतात असे घडू शकत नाही का?) असा चिथावणीखोर प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर त्या पोस्टचे समर्थन करत अनेक लोकांनी हिंसक प्रतिक्रिया देत म्हंटले आहे की, "हो असे व्हायला पाहिजे, याचीच वाट पाहतोय, सुरवात होणे बाकी आहे, नक्कीच होईल, हेच हाल होणार आहेत."

याचा सरळ अर्थ असा की भारतीय जनतेने देखील बांगलादेशातील लोकांप्रमाणे हिंसाचार करावा, अराजकता पसरवावी, कायदा हातात घ्यावा आणि लोकशाहीची पायमल्ली करावी. ही पोस्ट केवळ एका व्यक्तीचे मत नाही, तर संविधान, कायदा-सुव्यवस्था आणि देशाच्या शांततेसाठी थेट धोका आहे.

त्यानंतर पोलीस तपासानुसार सदर प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे व पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी यांच्याकडे ◀◀ पान २ वर

# पोलीस प्रशासनाचे वराती मागून घोडे

## सक्तीने वर्गणी गोळा केल्यास कारवाई होणार

बीड । प्रतिनिधी

गणेशोत्सवामध्ये सार्वजनिक गणेश मंडळाकडून व्यापाऱ्याकडून शक्तीने वर्गणी वसुली केली जाते. गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी काही ठिकाणी हा प्रकार केल्याचे पोलिसांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी या संदर्भात आदेश काढले मात्र हे आदेश गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीच काढायला हवे होते आता गणेशोत्सव समाप्त झाला आहे. आज श्री गणेशाची मिरवणूक निघणार आहे .मात्र पोलिसांना उशिरा जाग आल्याने त्यांनी आता कारवाई करणार असल्याचे जाहीर केले आहे. आज म्हणतात पोलिसांचे वराती मागून घोडे.

कुठलाही सार्वजनिक उत्सव असला की व्यापाऱ्याकडून सार्वजनिक उत्सव मंडळाच्या वतीने सक्तीने वर्गणी वसूल केली जाते. त्यामुळे व्यापारी वर्ग त्रासलेला आहे. सक्तीने वर्गणी वसूल करू नये असे आदेश असतानाही वसुली केली जाते. गणेशोत्सवामध्ये बऱ्याच ठिकाणी असे प्रकार घडले. त्यामुळे पोलिसांनी उशिरा का होईना याबाबत आदेश काढले. मात्र या आदेशाची अंमलबजावणी ही झाली पाहिजे असे सर्वसामान्य व्यापाऱ्यातून बोलले जात आहे.

सण-उत्सव शांततेत, सौहार्दपूर्ण व आनंदमय वातावरणात साजरे होणे आवश्यक आहे. या उस्तवामध्ये कोणीही शक्तीने वर्गणी गोळा करू नये. शक्तीने वर्गणी गोळा केल्यास कारवाई होणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली. ◀◀ पान २ वर

# डिजे मुक्त शांततेत,सुनियोजनाने श्रींना निरोप द्या - दिंद्रुड पोलिसांचे आवाहन

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड पोलीस हद्दीतील सर्व गणेश मंडळांनी डिजे मुक्त पारंपरिक वाद्यांच्या गजरात, नियोजनपूर्वक श्री गणेश विसर्जन करण्याचे आवाहन दिंद्रुड पोलिसांनी शुक्रवारी आयोजित शांतता समितीच्या बैठकीत केले.

यावर्षी दिंद्रुड पोलीस हद्दीत श्रीगणेश उत्सव शांततेत व विविध सामाजिक, धार्मिक उपक्रमांत पार पाडत आहेत.शनिवारी श्री विसर्जन करतांना पारंपारिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढावी, मिरवणुकीत नवतरूणांनी शांततेत सहभागी व्हावे, विसर्जन स्थळी प्रकाशझोत राहिल याची काळजी घ्यावी,खोल पाण्यात कुणीही जाणार नाही यासाठी पदाधिकार्यांनी लक्ष ठेवावे याबाबत सपोनी महादेव ढाकणे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.चोपनवाडी येथे प्रशासनाच्या एक गाव एक गणपती या उपक्रमांतर्गत एकच गणपती ◀◀ पान २ वर



# गोसावी सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी सिद्धेश्वर गिरी यांची निवड

चौसाळा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते सिद्धेश्वर गिरी यांची गोसावी सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. बीड तालुक्यातील सुलतानपूर येथील रहिवासी असलेले सिद्धेश्वर गिरी हे गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रमांतून लोकांमध्ये कार्यरत आहेत. तसेच समाजातील सर्वसामान्य माणसाच्या अडीअडचणीला ते कायम उपलब्ध असतात.



गोसावी समाजाच्या हक्कांसाठी व संघटनात्मक बळकटीसाठी कार्यरत असलेल्या गोसावी सेनेत जिल्हा पातळीवर नवी नेतृत्वशैली मिळावी या हेतूने नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते सिद्धेश्वर गिरी यांची जिल्हाध्यक्षपदी ◀◀ पान २ वर

# दुचाकी विद्युत खांबावर आदळली; तरूण जागीच ठार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धामणगाव वरून गावाकडे म निघालेल्या तरूणाचा दुचाकीवरील ताबा सुटल्याने रोडलगत असलेल्या विद्युत खांबावर जाऊन आदळल्याने झालेल्या अपघातात जागीच मृत्यू झाल्याची घटना बीड अहिल्यानगर राज्य महामार्गावरील घाटापिंपरी येथे गुरूवारी रात्री ११ च्या दरम्यान घडली. राहूल अशोक कोकरे वय वर्ष २६ असे मृत तरूणाचे नाव आहे.



आष्टी तालुक्यातील घाटापिंपरी येथील राहूल अशोक कोकरे वय वर्ष २६ हा धामणगांव वरून गुरूवारी रात्री दुचाकवरून गावाकडे निघाला होता. गावाजवळ येताच एका वळणार दुचाकीवरील ताबा सुटल्याने रोडलगत असलेल्या विद्युत खाबावर जाऊन दुचाकी आदळली. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. धामणगांव येथील प्राथमिक आरोग्य कें द्रात वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा रणवीर यांनी शवविच्छेदन केलें. अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस फौजदार सोपान येवले, होमगार्ड तुषार वामन यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.

# गणेशोत्सव,ईदच्या पार्श्वभूमीवर पाच जणांना बीड तालुका बंदीचे आदेश

बीड । प्रतिनिधी

गणेशोत्सव आणि इच्छा पार्श्वभूमीवर बीड तालुक्यामध्ये शांतता आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी असामाजिक कारवाई करणाऱ्या पाच जणांना बीड तालुका बंदीचे आदेश देण्यात आले आहेत ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षकांनी केली.

दि. ०३/०९/२०२५ रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांच्या आदेशानुसार, श्री गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद या सण उत्सव अनुषंगाने पाच इसमास बीड तालुक्यात प्रवेश बंदीचे आदेश देण्यात आले आहे. पो.स्टे. बीड ग्रामीण येथील कलम १६३ बी.एन.एस. एस. प्रमाणे रिपोर्ट प्राप्त झाल्याने सदर रिपोर्टमधील आरोपी नामे शरद गणपत पवार वय ३५ वर्ष रा.नवगण राजुरी ता. जि. बीड, तुकाराम लक्ष्मण पवार वय ४० वर्ष रा.नवगण राजुरी ता. जि. बीड, लक्ष्मण मरीबा वाघमारे वय ६० वर्ष रा. नवगण राजुरी ता. जि. बीड, विनोद आत्माराम मगर वय २९ वर्ष राहणार मंजिरी हवेली ता. जी. बीड , प्रवीण अशोक वीर वय ३३ वर्ष रा. करचुंडी ता.जी. बीड यांनी यापूर्वी केलेल्या गुन्हायाचे अनुषंगाने गणेश विसर्जन तसेच ईद-ए-मिलाद सणांच्या अनुषंगाने ◀◀ पान २ वर

# चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराचे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून नराधमास फाशीची शिक्षा द्या -भुंबे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

परळीच्या रेल्वे स्थानक परिसरात शनिवारी एस.सी.समाजाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराणे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून नराधमास फाशीची शिक्षा द्या, पिडीत कुटुंबाचे पुनर्वसन करा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांच्यासह शिष्टमंडळाने उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवार, दिनांक ३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक व उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मंगळवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री पंढरपूरहून परळी येथे कामाच्या शोधात आलेले एक मागासवर्गीय समाजाचे कुटूंब परळी रेल्वे स्टेशन परिसरात झोपले असता त्या कुटुंबातील एका लहान मुलीला निर्जन ठिकाणी घेऊन जाऊन तिच्यावर केला आहे. पिडीत मुलगी ही स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रूग्णालय, अंबाजोगाई येथे उपचार घेत आहे. परळी रेल्वे स्टेशनवर ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री जे रेल्वे पोलीस ड्यूटीवर होते. तसेच परळी संभाजीनगर पोलीस स्टेशनचे जे कर्मचारी ड्यूटीवर होते



# माणिक नगर गणेश मंडळाच्या वतीने होम मिनिस्टर स्पर्धा उत्साहात संपन्न

परळी । प्रतिनिधी

शहरातील माणिक नगर गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदाही विविध स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. गुरुवारी (ता.०४) सायंकाळी महिला भगिनींसाठी होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, या मध्ये महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

शहरातील माणिक नगर गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रमांचे ◀◀ पान २ वर

# आनंदनगरी नव्हेच चोर बाजार!

## आनंदनगरीचे चालक नंबर दोनच्या धंद्यातले

माजलगाव । प्रतिनिधी

मागील अनेक वर्षांपासून माजलगाव शहरात आनंदनगरीच्या नावाखाली नंबर दोनच्या धंदायावाल्यानी माजलगाव शहरात अक्षरशः चोर बाजार सुरु केला असून अनेक लोक या आनंदनगरीतील चोरबाजाराला बळी पडत आहेत. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही आनंद नगरीत मोबाईल चोर, पाकीट मार व गंठण चोरांनी लाखोचा ऐवज लंपास केला असून प्रशासन हातावर हात धरून बसले आहे.



माजलगाव शहरात मागील अनेक वर्षांपासून गणेशोत्सव काळात १५ ते २० दिवसापर्यंत आनंदनगरी चालू असते. सुरुवातीच्या काळात मोंढा मैदानात भरणारी ही आनंद नगरीं आता रेस्ट हाऊस रोड वर एका बंद पडलेल्या जिनिंग च्या मोकळ्या जागेत चालते. मागील १० वर्षांपासून या आनंद नगरीला दोन नंबर च्या धंद्यातील लोकांनी चालवण्यास घेतले असून तिर्ट, गुडगुडी, शूट व मटक्याच्या व्यवसायात असणारी काही छपरी पोर राजकीय पुढारी ◀◀ पान २ वर

### सिसिटीव्ही नावालाच

या आनंद नगरीत केवळ अटीची पूर्तता केल्याचे दाखवण्यासाठी ५-६ सी सी टी व्ही केमेरे लावण्यात आले असून ते ही अतिशय सुमार दर्जाचे व अनावश्यक ठिकाणी लावण्यात आले आहे. सी सी टीव्ही कॅमेऱ्याच्या समोरील बाजूस अशा प्रकारे फोकस लावण्यात आले आहे कि फोकस च्या प्रकाशा मुळे सी सी टीव्ही तील फुटेज दिसूच नये याची सोय आयोजकानी केली आहे. या मागचा त्यांचा हेतू वाईट असल्याचे स्पष्ट होते.

# गायक राज रायते यांना तेली समाजभूषण पुरस्कार जाहीर

## उद्या संभाजीनगर येथे होणार पुरस्काराचे वितरण

बीड । प्रतिनिधी

श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित अनेक गीतांचे गायन करणारे गायक राज रायते यांचे भरपूर गीत संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर भारतात गाजत आहे आणि वाजत आहेत. आजवर त्यांनी शेकडो गीते गायली असून त्याची रचना सुद्धा केलेली आहे. त्यांच्या गीतातून समाज जागृती होत असल्याने त्यांना तेली समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. उद्या दिनांक ७ रविवार रोजी संभाजीनगर येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. यासाठी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.



आपल्या आवाजाची जादू ही फक्त समाजात नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात राज रायते यांनी दाखवली आहे. अनेक नेतेमंडळी यांचे गीतही त्यांनी गायली आहेत, तसेच भरपूर ठिकाणी त्यांचे राज्यस्तरीय कार्यक्रम झाले असून अनेक ठिकाणी त्यांचा सत्कार झालेला आहे. सबंध तेली बांधव त्यांना सतत प्रोत्साहन देत असतात. तेली समाजाचे भूषण असलेले राज रायते यांना दिनांक ७ सप्टेंबर रविवार रोजी दुपारी २ वाजता तेली समाज भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra), Published at. Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26
Canol Road Beed, Tal- Dist.Beed 431122 (maharashtra), Published at. Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# गणेश विसर्जनासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सज्ज

## विसर्जन स्थळांवर वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, जीवरक्षक, निर्माल्य संकलनाची व्यवस्था

**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिका दरवर्षीप्रमाणे यंदाही पिंपरी चिंचवड शहरातील गणेश विसर्जन सुरळीत, सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडावे, यासाठी सज्ज झाली आहे. विसर्जन काळात नागरिकांच्या सुरक्षेसोबतच आरोग्य सुविधा, स्वच्छता व पर्यावरण संवर्धन यासाठी महापालिकेच्या विविध विभागांकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण, आरोग्य, वैद्यकीय, अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन, स्थापत्य, सुरक्षा असे महापालिकेचे विविध विभाग समन्वयाने काम करत आहेत.**

शहरातील २७ अधिकृत विसर्जन घाटांवर प्रकाशयोजना, पिण्याचे पाणी, पार्किंग, वैद्यकीय सुविधा, सुरक्षाव्यवस्था आणि वाहतूक नियोजनाची सोय करण्यात आली आहे. मोशी खाण हे मुख्य विसर्जन स्थळ निश्चित करण्यात आले असून, येथे क्रेन, आवश्यक मनुष्यबळ, पथदिवे, रस्त्यांची सुधारणा, दिशादर्शक फलक, सुरक्षारक्षक बंदोबस्त आणि अग्निशमन यंत्रणा तैनात केली आहे. प्रत्येक घाटावर प्रशिक्षित जीव रक्षक पथके, रेस्क्यू बोट, लाईफ जॅकेट्स, लाईफ रिंग्स आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गर्दी व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन दल देखील सज्ज ठेवले आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिनेमहत्त्वाच्या विसर्जन घाटांवर वैद्यकीय पथके व सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या





आहेत. वैद्यकीय अधिकारी, नर्स, वॉर्डबॉय आणि सफाई कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, मुबलक औषधसाठा व तात्काळ उपचारासाठी आवश्यक उपकरणे सज्ज ठेवण्यात आली आहेत.

पर्यावरणपूरक उपक्रमांवर भर

यंदा पर्यावरणपूरक उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला आहे. शहरभरात कृत्रिम जलकुंडे व निर्माल्य संकलन कुंडे उभारण्यात आले आहेत. नागरिकांनी हार, फुले, पाने व पूजेचे साहित्य थेट नदी-नाल्यात न टाकता निर्माल्य कुंड्यांमध्ये टाकावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. संकलित निर्माल्यापासून कंपोस्ट खत व सुगंधी उत्पादने तयार करण्याची योजना महापालिकेकडून हाती घेण्यात आली आहे. तसेच 'पुनरावर्तन' उपक्रमांतर्गत २६ केंद्रांवर शाडू मातीच्या मूर्ती संकलित करून मूर्तिकारांना शाडू माती पुनर्वापर करण्यासाठी उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय पीओपी मूर्तींसाठी अमोनियम बायकार्बोनेटचा वापर करून प्रदूषण नियंत्रणाची सोय करण्यात आली आहे. तरी नागरिकांनी विसर्जनासाठी अधिकृत घाटांचा वापर करावा, नदीत थेट प्रवेश करू नये, लहान मुलांना पाण्याजवळ एकटे सोडू नये तसेच निर्माल्य थेट पाण्यात न टाकता कुंड्यांमध्ये जमा करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

**गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. विसर्जन घाटांवर जीव रक्षक, वैद्यकीय पथके व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तैनात असून, पर्यावरणपूरक व सुरळीत विसर्जनासाठी महापालिका सज्ज आहे. नागरिकांनी देखील विसर्जन घाटांवर तैनात असणारेरेस्क्यू पथक व सुरक्षा पथकांकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे.**

**– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

**मूर्ती संकलन प्रभागनिहाय आकडेवारी**

आकडेवारी ४ सप्टेंबर २०२५ रात्री १० वाजेपर्यंतची

| | |
|---|---|
| अ प्रभाग : ६,५१२ | ब प्रभाग : १६,९०८ |
| क प्रभाग : ४,८५५ | ड प्रभाग : ६,९६७ |
| ई प्रभाग : ६,०८९ | फ प्रभाग : ८,०९२ |
| ग प्रभाग : ७,०७९ | ह प्रभाग : ५,९६७ |

एकूण : ६२,४६९

(पर्यावरण पूरक मूर्ती : १४,००८ पीओपी मूर्ती : ४८,४६१)

# पिंपरी-चिंचवडच्या उद्योगनगरीमध्ये राज्य लोकतंत्र ची दमदार सुरूवात

## दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत श्रींची आरती

पुणे । प्रतिनिधी

स्वातंत्र्यापूर्वी आणि त्यानंतर सुरू झालेल्या दैनिकांमध्ये मानाचे स्थान दै राज्य लोकतंत्र ने बीड जिल्ह्यात मिळविले आहे. तोच सुसंस्कृत विचाराचा वारसा पुढे नेत उद्योगनगरी पिंपरी चिंचवड मध्ये दुसरे पाऊल ठेवले आहे. समाजाच्या हिताला वाहून घेतलेल्या मानाच्या दैनिकांमध्ये राज्य लोकतंत्र उद्योगनगरीत प्रथम क्रमांकाने भरारी घेईल, अशा भावना मान्यवरांनी आज (शुक्रवारी) मान्यवरांनी व्यक्त केल्या.

दैनिक राज्य लोकतंत्र दैनिकाच्या कार्यालयामध्ये आज (शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर) शिक्षकदिनी हवेली तालुक्याच्या माजी सभापती हेमलता कांतीलाल काळोखे आणि





देहूगावचे माजी सरपंच कांतीलाल काळोखे यांनी भेट देऊन श्रींची आरती केली. तसेच, पिंपरी-चिंचवडचे माजी नगरसेवक चंद्रकांत (अण्णा) नखाते यांनी बाप्पाची महापूजा करून दैनिक राज्य लोकतंत्र ला शुभेच्छा दिल्या. यावेळी संपादकीय संचालक गणेश मोकाशे यांची उपस्थिती होती, प्रिंट आणि डिजिटल स्वरूपाचे हे वृत्तपत्र वाचकांच्या गळ्यातील ताईत बनेल, असा विश्वास माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते यांनी व्यक्त केली. दैनिक राज्य लोकतंत्र च्या कार्यालायमध्ये देहूगावचे माजी सरपंच काळोखे, हवेलीच्या माजी सभापती हेमलता काळोखे आणि माजी नगरसेवक नखाते यांनी उद्योगनगरी, सामाजिक आणि राजकीय विषयावर मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. पुणे, पिंपरी-चिंचवड शहराला ऐतिहासिक वारसा लाभला आहे, तो जपण्याचे कार्य आजपर्यंत दैनिकांनी केले आहे. त्यामध्ये आता दैनिक राज्य लोकतंत्र उडी घेतल्याचे पाहून समाधान वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी दै राज्य लोकतंत्र चे संपादकीय संचालक गणेश मोकाशे उपसंपादक अशोक बाळगुडे सोबत हरिश्चंद्र देहुकर यासह राज्य लोकतंत्र मधील उपसंपादक सहकारी उपस्थित होते.



## पिंपरी-चिंचवडमध्ये गणेशोत्सव बंदोबस्तासाठी पोलीस मित्र सज्ज; २०० सभासद मैदानात

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सव काळात पोलीस बंदोबस्ताला सहकार्य करण्यासाठी पोलीस मित्र संघटनेचे २०० सदस्य पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात कार्यरत झाले असल्याची माहिती संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष राजेंद्र कपोते यांनी दिली आहे.

गेल्या १२ वर्षांपासून संघटनेचे कार्य सुरू असून गर्दी नियंत्रण, हरवलेल्यांना मदत केंद्रापर्यंत पोहोचवणे, वयस्करांना मदत करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलीसांना सहकार्य करणे अशी कामे सभासद कोणत्याही मोबदल्याविना करतात.

यंदा १०० सभासद पुण्यासाठी तर १०० पिंपरी-चिंचवडसाठी नियुक्त करण्यात आले आहेत. पुण्यात बेलबाग चौक ते मंडई परिसरात हे सभासद पोलीसांसोबत बंदोबस्तासाठी काम करीत आहेत. सभासदांनी बॅच लावणे बंधनकारक असून विसर्जन मिरवणुकीसाठी आणखी सभासद सहभागी होणार असल्याचे कपोते यांनी सांगितले.

## नळवणे येथे 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमांतर्गत भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

ओझर । प्रतिनिधी

डिसेंट फाउंडेशन, पुणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पुणे, ग्रामपंचायत नळवणे, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ नळवणे आणि बहुजन विचार मंच आणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, ५ सप्टेंबर २०२५ रोजी नळवणे येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात 'श्रीगणेशा आरोग्याचा' या उपक्रमांतर्गत भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरात हृदयरोग, मूत्ररोग, कॅन्सरपूर्व तपासणी, हाडांचे आजार, स्त्रीरोग, त्वचारोग यासह रक्तदाब, मधुमेह आणि विविध रक्त तपासण्या प्रख्यात तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मोफत करण्यात आल्या. याशिवाय, ३७ ज्येष्ठ नागरिकांची आयुष्यमान वयोवंदना





ओळखपत्र नोंदणी, ४० वयोवृद्धांना आधाराच्या काठ्यांचे वाटप आणि नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच दिव्यांगांसाठी कृत्रिम साहित्य वाटपाची नोंदणी यांचाही समावेश होता. शेकडो ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला.

श्री हॉस्पिटल (आळेफाटा), डोके हॉस्पिटल (नारायणगाव), आळेफाटा हॉस्पिटल, भीमाशंकर हॉस्पिटल, वलव्हणकर क्लिनिक (ओतूर), प्राथमिक आरोग्य केंद्र (बेल्हे) आणि हिंद लॅब (जुन्नर) यांनी शिबिरात सक्रिय सहभाग घेतला.

शिबिराचे समन्वयक कृष्णा रोकडे, कैलास लासुर्वे, डॉ. गणेश शेलार, डॉ. अश्विनी शेलार, डॉ. अवदूत वलव्हणकर, डॉ. अदिती वलव्हणकर, प्रयोगशाळा समन्वयक अजय वाळुंज, तपासणी तज्ञ सपना बेलवटे, आरोग्य मित्र दिपाली जोरी, स्नेहा अल्हाट आणि प्राथमिक आरोग्य केंद्र बेल्हेच्या सर्व आशा सेविका यांनी मोलाचे योगदान दिले.

शिबिरात डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. एकनाथ डोंगरे, संचालक आदिनाथ चव्हाण, निलेश कणसे, सरपंच अर्चना उबाळे, दीपक चव्हाण, अतुल गोफने, अरविंद पंडित, डॉ. रचना घोडे, डॉ. विशाल घोडे, पंकाशेठ कणसे, साळवाडीच्या सरपंच कल्पना वैभव शेठ काळे, पेमदराच्या सरपंच जयश्री गाडेकर आणि नळवणे गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उपक्रमाचे महत्त्व**

'श्रीगणेशा आरोग्याचा' हा उपक्रम नळवणे परिसरातील नागरिकांच्या आरोग्य सुधारणेसाठी महत्त्वाचा ठरला असून, मोफत तपासणी आणि सुविधांमुळे ग्रामस्थांमध्ये उत्साह दिसून आला. हा उपक्रम सामाजिक आणि आरोग्यदायी जागरूकतेसाठी एक आदर्श पाऊल ठरला आहे.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची 'एनआयआरएफ' क्रमवारीत मोठी घसरण

**पुणे । प्रतिनिधी**

**एकेकाळी 'पूर्वेचे ऑक्सफर्ड' म्हणून गौरवले गेलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यंदाच्या 'राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क' (एनआयआरएफ) क्रमवारीत मोठ्या प्रमाणात घसरले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने गुरुवारी जाहीर केलेल्या २०२५ च्या क्रमवारीत, गेल्या वर्षी (२०२४) देशातील सर्वोत्कृष्ट १०० संस्थांमध्ये ३७व्या स्थानावर असलेले पुणे विद्यापीठ यंदा ९१व्या क्रमांकापर्यंत खाली आले आहे. तसेच, देशातील सर्वोत्कृष्ट १०० विद्यापीठांमध्ये ते ५६व्या स्थानावर आहे. सलग सहाव्या वर्षी विद्यापीठाच्या क्रमवारीत घसरण झाल्याने चिंता व्यक्त होत आहे.**

पुण्यातील खासगी आणि अभिमत विद्यापीठांनी यंदा पुणे विद्यापीठाला मागे टाकले आहे. 'एनआयआरएफ' क्रमवारीत सिंबायोसिस इंटरनॅशनल विद्यापीठाने ४०वे, भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेने (आयसर) ५५वे, तर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाने ७१वे स्थान पटकावले आहे. गेल्या वर्षी पुणे विद्यापीठ सर्वोत्कृष्ट १०० विद्यापीठांमध्ये २३व्या आणि सर्वोत्कृष्ट ५० सार्वजनिक राज्य विद्यापीठांमध्ये तिसऱ्या स्थानावर होते. यंदा मात्र सार्वजनिक राज्य



विद्यापीठांच्या क्रमवारीतही ते ११व्या स्थानावर घसरले आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या 'एनआयआरएफ' क्रमवारीत शिक्षण संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय, विधी, कृषी, इनोव्हेशन, मुक्त विद्यापीठे, कौशल्य विद्यापीठे आणि सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स अशा १७ गटांमध्ये क्रमवारी जाहीर होते. यामध्ये संशोधन, सर्वसमावेशकता, पदवीधारकांचे निकाल आणि शिक्षणाची गुणवत्ता यासारखे निकष विचारात घेतले जातात.

विद्यापीठ प्रशासनाने क्रमवारीतील घसरणीचे मुख्य कारण प्राध्यापकांच्या संख्येतील कमतरता असल्याचे नमूद केले आहे. गेल्या काही वर्षांत अनेक ज्येष्ठ प्राध्यापक निवृत्त झाले, ज्यामुळे विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तरावर (एफएसआर) परिणाम झाला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नवीन अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांची संख्या वाढली, परंतु प्राध्यापकांची संख्या अपुरी राहिल्याने गुणोत्तर बिघडले. तसेच, निवृत्त प्राध्यापक हे उत्कृष्ट संशोधक असल्याने त्यांच्या अनुपस्थितीत संशोधन प्रकाशनांमध्येही घट झाली.

विद्यापीठाकडून आश्वासन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सांगितले, रँकिंगमधील घसरणीकडे आमचे लक्ष आहे. विद्यापीठाची कामगिरी सुधारण्यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील. सध्या प्राध्यापक भरती प्रक्रिया सुरू आहे. ती पूर्ण झाल्यावर विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर आणि संशोधन क्षेत्रात लक्षणीय सुधारणा होईल.

## पुणे पदवीधर निवडणुकीची सूत्रे राजेश पांडे यांच्याकडे, भाजपने दिली मोठी जबाबदारी

पुणे । प्रतिनिधी

पुढील वर्षी होणाऱ्या विधान परिषदेच्या पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी भाजपकडून प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांची 'मतदार नोंदणी प्रमुख' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांनी नियुक्तीपत्र प्रदान केले.

याचबरोबर आमदार संजय केनेकर यांची छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघासाठी, तर प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य सुधाकर कोहळे यांची नागपूर पदवीधर



मतदारसंघासाठी 'मतदार नोंदणी प्रमुख' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.याबाबत राजेश पांडे म्हणाले, सलग तिसऱ्या पदवीधर निवडणुकीसाठी 'मतदार नोंदणी प्रमुख' म्हणून पक्षाने माझ्यावर विश्वास दाखविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांनी माझ्यावर टाकलेली जबाबदारी मी योग्य पद्धतीने पार पाडीन. पुणे पदवीधर मतदारसंघात पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे.या निवडणुकीत नोंदणीकृत पदवीधरांना मतदानाचा हक्क आहे. १ डिसेंबर २०२० रोजी निवडणूक झाली होती. दर सहा वर्षांनी ही निवडणूक होते. या वेळी संघटनात्मक बांधणीच्या जोरावर आम्ही अधिकाधिक पदवीधरांची नोंदणी सुनिश्चित करू.

## वनराज आंदेकरच्या हत्येचा बदला, गोविंदा कोमकरचा तीन गोळ्या झाडत खून, गँगवॉरमध्ये मामाच्या हत्येचा बदला भाच्याच्या हत्येनं, पुणे हादरलं

पुणे । प्रतिनिधी

गणेश विसर्जनाच्यापूर्वसंध्येला पुणे हादरलं आहे. पुण्यातील नाना पेठेत गोविंदा कोमकर याच्यावर गोळीबार करत त्याची हत्या करण्यात आली आहे. आंदेकर टोळीकडून वनराज आंदेकर याच्या हत्येचा बदला एका वर्षात गोविंदा कोमकर याच्या हत्या करत घेण्यात आल्याचा संशय आहे. गेल्या वर्षी म्हणजेच १ सप्टेंबर २०२४ ला पुण्यात वनराज आंदेकर याची हत्या झाली होती. त्याच्या हत्येचा बदला आंदेकर टोळीनं घेतल्याचं म्हटलं जातंय.

मागील वर्षी ज्याची हत्या झाली तो वनराज आंदेकर आणि आज ज्याची हत्या झाली तो गोविंदा कोमकर हे सख्खे मामा – भाचे आहेत. वनराजच्या हत्या प्रकरणात आज ज्याची हत्या झाली त्या गोविंदाचे वडील गणेश , काका जयंत आणि काकू संजीवनी हे तुरूंगात आहेत. गोविंदा हा संजीवनी



कोमकरचा पुतण्या, गणेश कोमकरचा मुलगा आहे.

गोंविदा कोमकर याची हत्या पुण्यातील नाना पेठेत घडली आहे. विसर्जन मिरवणुकीच्या पूर्वसंध्येला ही हत्या झाल्यानं पुण्यात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. बरोबर एक वर्षापूर्वी १ सप्टेंबर २०२४ ला वनराज आंदेकर याची हत्या झाली होती. तो राष्ट्रवादी काँग्रेसचा माजी नगरसेवक होता. गोंविदा कोमकर याच्या या हत्येमुळं आंदेकर टोळीकडून बदला घेण्याचा प्रयत्न केला गेल्याचं म्हटलं जातंय. काहीच दिवसांपूर्वी आंदेकर टोळीकडून वनराज आंदेकर हत्या प्रकरणातील आरोपींच्या नातेवाईंकावर पाळत ठेवली जात असल्याचं समोर आलं होतं, पोलिसांनी कारवाई केल्याचं सांगितलं होतं तरी देखील आज गोविंदा कोमकरची हत्या घडली आहे.

गोविंदा कोमकरची तीन गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. गोविंदा कोमकर याचे मारेकरी फरार झाले आहेत. पुण्यात पुन्हा एकदा टोळीयुद्ध भडकल्याचं समोर आलंय. पुण्यातील नाना पेठेत हे हत्याकांड झालं आहे. वनराज आंदेकर याची हत्या गेल्या वर्षी जिथं झालेली होती त्यापासून जवळच ही हत्या झालीय. आंदेकर आणि कोमकर यांच्यातील गृहकलह उफाळून आला आहे. मामा हत्येचा बदला, भाच्याची हत्या करुन घेतला गेला आहे. भाजपचे कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी या संदर्भात पोलीस प्रशासन योग्य कारवाई करेल. या कुठल्याही गोष्टीचा विसर्जन मिरवणुकीवर परिणाम होणार नाही याची दक्षता पोलिसांनी घ्यावी, असं म्हटलं आहे. दरम्यान, नाना पेठेत पुणे पोलीस दाखल झाले आहेत. या ठिकाणी तणावाचं वातावरण निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं आहे.